

भाजपात प्रवेश होताच एकनाथ खडसे राज्यपाल होणार?
आज वाचा पान १ वर....

DAILY JAY MAHABHARAT

दैनिक जय

# महाभारत

संपादक - विजयकुमार वाव्हळ

jaymahabharat2015@gmail.com www.dainikmahabharat.com



.....अन्यथा संपूर्ण मराठा समाज परळीत घुसणार..!
आज वाचा पान १ वर....

बीड | सोमवार, दि.०८ एप्रिल २०२४ | RNI.NO.MAHMAR/2015/64418 | वर्ष ९ वे | अंक २३८ | पाने ६ | किंमत २ रू | L/RNP/172/Renewal/2023-2025

## इशारा



बिहार में एक बार फिर भाजपा-एनडीए की भारी लहर देखने को मिल रही है। आज सुबह करीब ११ बजे नवादा की जनसभा में मतदान को लेकर उत्साहित अपने परिवारजनों से मिलने का सौभाग्य मिलेगा।
नरेंद्र मोदी



केरल की राजधानी तिरुवनंतपुरम में स्थित प्रसिद्ध, ऐतिहासिक और पवित्र ऐसे श्री पद्मनाभस्वामी मंदिर में जगत पालनकर्ता प्रभु श्री विष्णु जी के दर्शन-पूजन करने का सौभाग्य प्राप्त हुआ। इस दौरान समस्त देश व प्रदेशवासियों के कल्याण की प्रार्थना की।
देवेंद्र फडणवीस



मंत्रिमंडळातील आमचे सहकारी, राज्याचे सहकार मंत्री श्री. ळुश्रीशरीिंळश्र जी यांची पुण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट घेतली, तब्बेतीची विचारपूस केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस शिवाजीराव गर्जे हे सुद्धा सोबत होते.
अजित पवार



नरेंद्र मोदी के साथ अरबपतियों की ताकत है,हमारे साथ किसान-मज़दूर का विश्वास। उनके पास झूठ और फर्जी प्रचार है,हमारे पास ५ न्याय का संकल्प। उनके पास इलेक्टोरल बॉण्ड की ताकत है, हमारे पास देशवासियों से मिला योगदान।
राहुल गांधी

# रामनवमी ज़वळ येत आहे पाप करणाऱ्यांना विसरु नका

**प्रतिनिधी** | पाटणा

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी विविध राज्यांत मॅरेथॉन सभा घेत आहेत. आज बिहारच्या नवादा येथे जाहीर सभेला त्यांनी संबोधित केले. मोदी यांनी दिलेली आश्वासनं बेकायदेशीर आहेत अशा विरोधकांच्या आरोपावर इंडिया आघाडीच्या नेत्यांचा संदर्भ देत, 'माझी नियत साफ आहे आणि दिलेले आश्वासन पूर्ण करण्याची ताकद माझ्यात आहे' असे नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले.

जानेवारी महिन्यात अयोध्येत बांधलेल्या श्रीराम मंदिराचा भव्य सोहळा झाला. त्या सोहळ्यात अनेक पक्षांनी पाठ फिरवली होती. श्रीरामाचे भव्य मंदिर उभारले जाईल असे दिलेले आश्वासन पंतप्रधानांनी पूर्ण केले आहे. मंदिराचे काम थांबण्यासाठी काँग्रेस आणि राजदने वर्षानुवर्षे प्रयत्न केले. मात्र तरीही राममंदिराचे काम पूर्ण झालेच. 'रामनवमी जवळ येत आहे, पाप करणाऱ्यांना विसरू नका. मोदींच्या गॅरंटीमुळेच त्यांची दुकाने बंद होत आहेत, हे त्यांना माहित असल्यामुळेच ते लोक मोदींच्या गॅरंटीला विरोध करत आहेत', असा घणाघात नरेंद्र मोदी यांनी केला.

इंडिया आघाडी म्हणजे देशद्रोही शक्तीचे घर



इंडिया आघाडीचे लोक भारताचे विभाजन करण्याची भाषा बोलतात. काँग्रेस आणि आरजेडीला एकही मत मिळण्याचा अधिकार नाही. या लोकांना सत्तेचे व्यसन लागले आहे. सत्तेतून बाहेर पडताच ते पाण्यातल्या माशाप्रमाणे तडफड करतात, अशी टीका नरेंद्र मोदी यांनी केली.

# माझं भांडण शरद पवारांसोबत आहे, सुप्रिया सुळेंसोबत नाही



**प्रतिनिधी** | अकोला

माझं भांडण हे शरद पवारांसोबत आहे, सुप्रिया सुळेंसोबत नाही, त्यामुळेच आम्ही बारामतीमध्ये त्यांना पाठिंबा द्यायचा निर्णय घेतला असल्याचं वंचितते प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सांगितलं. नाना पटोलेंचा प्रस्ताव म्हणजे वरातीमागून घोडे असा प्रकार आहे, त्यामुळे पटोलेंच्या प्रस्तावावर आता कोणताही निर्णय होणार नाही असं आंबेडकरांनी स्पष्ट केलं.

प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राजकारण हे व्यक्तीगत स्तरावर होत असेल तर ते चुकीचं आहे. राजकारण हे पक्षाच्या स्तरावर होणं आवश्यक आहे. माझं भांडण हे शरद पवारांसोबत आहे, सुप्रिया सुळेंसोबत नाही. शरद
(उर्वरीत पान २ वर)

### राज्यसभेची ऑफर नाही

काँग्रेसच्या नेत्यांनी प्रकाश आंबेडकरांना राज्यसभेची खासदारकी आणि केंद्रात मंत्रिपदाची ऑफर दिल्याच्या बातम्या येत आहेत. त्यावर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, राज्यसभा खासदारकीचा कोणताही प्रस्ताव माझ्याकडे आलेला नाही, वर्तमापत्रांपर्यंत आलेला प्रस्ताव असेल.

# सर्वात मोठी बातमी, भाजपात प्रवेश होताच एकनाथ खडसे राज्यपाल होणार?

## पडद्यामागे काय घडतंय?

**प्रतिनिधी** | जळगांव

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार एकनाथ खडसे यांची भाजपात घरवापसी होणार आहे. एकनाथ खडसे यांनी स्वत: याबाबत माहिती दिली आहे. मी भाजपात प्रवेश करणार आहे, असं एकनाथ खडसे म्हणाले आहेत. एकनाथ खडसे यांनी साडेतीन वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला होता. या दरम्यान त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून विधान परिषदेची आमदारकी देण्यात आली. ते सध्या विधान परिषदेचे आमदार आहेत. असं असताना त्यांनी आता परत भाजपात घरवापसी करण्याचा निर्णय घेतला आहे. एकनाथ खडसे यांच्या या निर्णयामुळे राज्यातील

सत्तेची समीकरणं बदलतात



का? ते आगामी काळात स्पष्ट होईल. पण एकनाथ खडसे यांच्या पक्षप्रवेशानंतर त्यांना पक्षाकडून मोठी जबाबदारी दिली जाण्याची शक्यता आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एकनाथ खडसे यांच्या पक्षप्रवेशानंतर त्यांची राज्यपालपदी वर्णी लागण्याची शक्यता आहे. असं असलं तरी भाजपकडून किंवा एकनाथ खडसे यांच्याकडून राज्यपालपदाच्या जाबाबदारी बाबत अधिकृत माहिती अद्याप देण्यात
(उर्वरीत पान २ वर)

# वंचित बहुजन आघाडी कडून अशोक हिंगे पाटील यांना उमेदवारी जाहीर..!

**बीड लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीच्या वतीने उमेदवार कोण असेल? याची उत्सुकता आता संपलेली आहे**

**प्रतिनिधी** | बीड

**वंचित बहुजन आघाडीच्या वतीने बीड लोकसभेसाठी अशोक हिंगे पाटील यांना उमेदवार म्हणून रिंगणात उतरवले आहे. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने अशोक हिंगे हे कुणबी मराठा यांच्या उमेदवारीवर आता शिक्कामोर्तब झाले आहे.आशोक हिंगे हे वंचित बहुजन आघाडी चे मराठवाडा अध्यक्ष असून ते बाळासाहेब आंबेडकर यांच्या अत्यंत जवळचे असून त्यांनी मराठवाड्यात जिल्हा निहाय मोठ मोठे मेळावे घेऊन मराठवाड्यात वंचित बहुजन आघाडी ची पक्ष बांधनी केली आहे.**



तसेच ते मराठा आरक्षणासंदर्भात ही खूप सक्रीय होते.त्यांच्या युवक काळा पासुन ते मराठा आंदोलनात सक्रिय असतात.त्याचबरोबर त्यांना दलित, मुस्लिम वर्गात मानणारा वर्ग ही खूप मोठा आहे. याच कारणाने आज त्यांच्या गळ्यात वंचित बहुजन आघाडीची माळ पडल्याच बोलले जात आहे.

# माझी निवडणुकीची तयारी पाचही वर्ष चालू असते- पंकजा मुंडे

**प्रतिनिधी** | बीड

राज्याच्या राजकारणात महत्त्वाचा जिल्हा समाजाला जाणाऱ्या बीड लोकसभा मतदारसंघातून भाजपकडून पंकजा मुंडे यांना उम ऋदवारी देण्यात आली आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीने



शरद पवार गटाकडूनबजरंग सोनवणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर, बजरंग सोनवणेंना उमेदवारी जाहीर होताच पंकजा मुंडेंची पहिली प्रतिक्रिया देखील समोर आली आहे. 'बीडची जनता फार सुज्ञ असून, बजरंग सोनवणे यांना तिकीट जाहीर झाले असेल तर त्यांना शुभेच्छा' असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. तर, ज्योती मेटे यांचा पत्ता कट झाल्याने यावर देखील पंकजा मुंडे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. बजरंग सोनवणे
(उर्वरीत पान २ वर)

# अनिलदादा यांच्या फेसबुक पोस्टने ओबीसींची मने जिंकली

## जातीवाद रोखण्यासाठी मराठा नेत्यांचा पुढाकार



**प्रतिनिधी** | बीड


निवडणूकीत मराठा विरुध्द ओबीसी असा जातीयवाद करण्याचा प्रयत्न फेसबुकच्या माध्यमातून काही लोक करत असले तरी भविष्यात मराठा समाजाच्या पुढाऱ्यांना सुध्दा असा जातीयवाद परवडणारा नाही. त्यामुळे या निवडणूकीत मनोज जरांगे पाटील यांनी तटस्थ भूमिका घेतल्यामुळे आता मराठा समाजाच्या पुढाऱ्यांनी सामाजिक समतेसाठी पुढाकार घ्यायला सुरुवात केली आहे. बीड लोकसभा मतदार संघात भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे ओबीसी असल्यामुळे त्यांना मराठा समाजाचे समर्थन मिळावे यासाठी मराठा नेत्यांनी प्रामाणिक प्रयत्न चालवले आहेत. त्याचाच अनुभव
(उर्वरीत पान २ वर)

## बेधडक

# टीआरपी

विषय कोणताही असो त्यावर थोडाफार वादविवाद होतो, मिडियाचा लागलीच त्यावर चर्चेचा परिसंवाद ठरतो..!

वादविवाद करणारी मंडळी वाद टाळण्याचा प्रयत्न करतो, मीडिया मात्र टीआरपी साठी आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न करतो...!!



प्रा.एस खंडागळे
पाटोदा (बीड)
मो.९६५७२८४४४४

# गुढीपाडवा,नववर्ष निमित्त मंगळवारी बीड शहरातून भव्य स्वागत फेरीचे आयोजन

बीड |प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी हिंदू नववर्ष गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर हिंदू धर्मात नव्या वर्षाची सुरुवात गुढीपाडव्यापासून केली जाते, यंदा गुढीपाडवा मंगळवारी नऊ एप्रिल रोजी येत आहे. गुढीपाडव्याचे विविध धार्मिक महत्त्व सर्वांनाच माहित आहे. साडेतीन मुहूर्तापैकी एक महत्त्वाचा शुभ दिवस जसा आहे तसंच यावर्षी प्रभू श्रीराम जन्मभूमी अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर यावर्षी वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. यानिमित्ताने सकाळी ७ वाजता मोंढ्यातील बालाजी मंदिरा पासून भव्य स्वागत फेरीचे
(उर्वरीत पान २ वर)

# .....अन्यथा संपूर्ण मराठा समाज परळीत घुसणार..!

## पालकमंत्री मुंडेंना जरांगेंनी दिला निर्वाणीचा इशारा !

**प्रतिनिधी** | परळी

परळीमध्ये मागील काही दिवसांपासून मराठ्यांच्या मुलींना त्रास देण्याचे प्रकार होत आहेत. खेदाची बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी परळीत धनंजय मुंडे यांची सभा झाली, त्या दिवसांपासून तर या प्रकारात मोठी वाढ झाल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. पालकत्व असलेल्या धनंजय मुंडेंनी या निंदनीय प्रकारांकडे तातडीने लक्ष द्यावे, अन्यथा संपूर्ण मराठा समाज परळीत घुसल्याशिवाय राहणार नाही, असा निर्वाणीचा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री मुंडेंना दिला आहे.

आम्ही मराठे, गावपातळीवर सर्वांसोबत समता व बंधुभावाच्या नात्याने वागतो. दुसऱ्यांच्या लेकी-बाळींना आदरभावाने तथा आपल्या लेकी-बाळीतूल्य समजून वागत असतो. आमच्या मुलींना त्रास देऊन विनाकारण वातावरण खराब करु नका. सामाजिक स्वास्थ्य बिघडवू नका, त्यांच्या आयुष्याला धब्बा लागला जाईल,असे कोणतेही कृत्य, कोणाकडूनही यापुढे होता कामा नये, असेही खडे बोल, अप्रत्यक्षरित्या मुंडेंनाच, जरांगे पाटील यांनी सुनावले.

ते पुढे असेही म्हणाले की, राज्याचे गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात वेळीच लक्ष घालणे आवश्यक असून, मानवतेला काळीमा फासणारे तसे कृत्य त्यांनी त्वरीत थांबवावेत, अन्यथा नाईलाजास्तव मराठ्यांनाही दंडूके हाती घ्यावे लागतील. जर का दंडुके घेण्याचीच पाळी आली तर मात्र ते तुटल्याशिवाय मराठे माघारी हटले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी, असा इशारा सुध्दा



जरांगे यांनी दिला आहे.

राज्य शांत आहे, आम्हालाही ते अशांत होऊ द्यायचे नाही. शिवाय आमच्या लेकी-बाळींना जाणीवपूर्वक केला जाणारा तो कथित त्रास त्वरीत थांबवला गेला पाहिजे. बीड जिल्ह्याचे एस.पी. विनाकारण गुन्हे दाखल करीत आहेत. त्यांनी सुध्दा परिस्थितीचे गांभीर्य ध्यानी घेऊन मानवतेला काळीमा फासले जाणारे कारस्थानी धंदे वेळीच थांबवा, अन्यथा हा शेवटचा इशारा समजून बीड सह राज्यात सर्वत्र खुलेआम सुरु असलेली दडपशाही तात्काळ थांबली गेली पाहिजे. शांतता भंग होईल, अशा कोणत्याही प्रकारांना प्रोत्साहन मिळू नये, ज्यामुळे शांत असलेल्या मराठ्यांचा राग अनावर होऊ शकेल, अशी पाळी येता कामा नये, असेही जरांगे यांनी सूचित केले आहे.

एकूणच काय तर सध्या निवडणूकीची नाजूक वेळ आहे. निवडणूकीला बाधा येईल व शांतता भंग होईल, असे कोणतेही प्रकार होऊ नयेत. सामाजिक ताण-तणाव वाढीस लागून कोणाचेही स्वास्थ्य बिघडले जाणार नाही, याची काळजी बीडचे एस.पी., जिल्हाधिकारी आणि विभागीय पोलीस महासंचालकांनी तत्परते घ्यावी, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारलाही केले आहे.

# संपादकीय

## उदासीनतेले आक्रंदन

स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतात मतदानाची टक्केवारी कधीही समाधानकारक नव्हती आणि नाही. स्वातंत्र्य मिळाल्याचा क्षण किती ऐतिहासिक होता. भारताचा सलग, एकसंध नकाशा साकारला होता. तरीही, सन १९५२मध्ये केवळ ४५ टक्के पात्र मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार बजावला. ही टक्केवारी वाढत वाढत सन २०१९मध्ये ६७.४० टक्क्यांवर आली. हा मतदानाचा आजवरचा विक्रम आहे. सन १९७७मध्ये मतदारांनी ऐतिहासिक कौल देऊन काँग्रेसला प्रथमच घरी पाठवले आणि जनता पक्षाचे राज्य आणले. तेव्हाही (फक्त) ६० टक्के मतदारांनीच मतदान केले होते. या निवडणुकीत किती मतदान होते, ते कळेलच; पण त्या आधी ज्या युवक-युवतींना मतदानाचा अधिकार मिळाला आहे; अशा किमान चार कोटी ९० लाख नवमतदारांपैकी केवळ ३८ टक्के नवमतदारांनीच मतदार नावनोंदणी केल्याचे उघड झाले. या नवमतदारांची ही उदासीनता धक्कादायक आहे. मतदानाचा निर्णय तर पुढचा, पण त्या आधी आपले नाव तरी निदान मतदारयादीत असावे; असेही या मुलामुलींना का वाटू नये? सन २०१९मध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्याचे प्रमुख कारण अनेक राज्यांमध्ये घराबाहेर पडलेल्या महिला मतदार, असे सांगितले गेले. हे खरे असेल तर महिलांचे हे सबळीकरण १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या सगळ्याच मुलींना का भावले नसावे?

इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर विक्रमी यश मिळवून राजीव गांधी पंतप्रधान झाले. तेव्हा त्यांनी सन १९८८मध्ये ६१वी घटनादुरुस्ती करून भारतातील मतदानाचे वय २१वरून १८वर आणले. हा फार महत्त्वाचा निर्णय होता. हे वय १८वर आणावे, अशी चर्चा संसदेत त्या आधी किमान दोन दशके चालू होती. मात्र, प्रत्यक्ष निर्णय राजीव गांधी यांनी घेतला. १८ ते २१ वर्षे या वयोगटातील काही कोटी तरुणांना नव्या सरकारच्या निवडीत समाविष्ट करून घेणे, हे संसदीय लोकशाहीचे पुढचे पाऊल होते. असा अधिकार हातात येणे; ही तरुणांच्या आयुष्यातील किती रोमहर्षक, आनंददायी घटना असायला हवी! तसेच, हा केवळ अधिकार नाही; ते महत्त्वाचे कर्तव्यही आहे. मात्र, या साऱ्या प्रक्रियेशी आपण जोडले जावे, असे जर तरुणांना वाटत नसेल तर त्यात त्यांच्यापेक्षा उर्वरित साऱ्या समाजाचे आणि या समाजावर राज्य करणाऱ्या सगळ्या राजकीय पक्षांचे, नोकरशाहीचे काही तरी निश्चितच चुकते आहे. प्रचारासाठी कोट्यवधी रुपये खर्च करणाऱ्या, आपल्या राष्ट्रीय नेत्यांच्या पायांना विमानाची चाके बसविणाऱ्या राजकीय पक्षांना प्रचार मोहिमांच्या आधी मतदार नोंदणीची मोहीम आखावी आणि एकही नवमतदार यादीच्या बाहेर राहू नये, असे का बरे वाटत नसावे? पंतप्रधान नरेंद्र मोदी अलीकडे अनेक सभांमध्ये 'कुणालाही मतदान करा; पण मतदानाचा हक्क बजाविल्याशिवाय राहू नका,' असे आवाहन करीत असतात. ते सार्थ ठरायचे तर आधी नाव यादीत हवे. ते काम राजकीय पक्षांनी का करू नये?

**कार्यकारी संपादक**
**प्रथमेश विजयकुमार वाव्हळ**



पान १ / ६ वरून...

**माझं भांडण शरद..**

पवारांनी आतापर्यंत आपल्या पक्षाचं नुकसान केलं आहे, सुप्रिया सुळे यांनी वंचितचं कोणतंही नुकसान केलं नाही.

प्रकाश आंबेडकरांच्या वंचितने शनिवारी त्यांचे शिरूरचे उमेदवार मंगलदास बांदल यांची उमेदवारी रद्द केली होती. त्यावर आंबेडकरांनी प्रतिक्रिया दिली. शिरूरच्या उमेदवाराचा बारामतीच्या निर्णयाला विरोध होता,

**सर्वात मोठी बातमी,...**

आलेली नाही.

महाराष्ट्रात २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीचं सरकार स्थापन झालं होतं. त्यावेळी एकनाथ खडसे हे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार होते. पण अचानक भाजपने धक्कातंत्राचा वापर करत भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री केलं. त्यावेळी एकनाथ खडसे यांनी पहिल्यांदा बंड पुकारलं होतं. त्यांनी स्वत:ला घरात बंद करुन घेतलं होतं. त्यावेळी पहिल्यांदा खडसेंची नाराजी समोर आली होती. त्यांची नाराजी दूर करण्यात भाजप नेत्यांना तेव्हा यश आलं होतं. त्यावेळी खडसेंना महसूल मंत्रीपद मिळालं होतं. पण त्यानंतर लगेच काही दिवसांनी त्यांच्यावर जमीन घोटाळा प्रकरणी आरोप झाले. यामुळे खडसेंचं मंत्रीपद गेलं. त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर खडसेंनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते.एकनाथ खडसेंना आपल्याच पक्षात घुसमट होत होती. विशेष म्हणजे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत खडसेंच्या कन्या रोहिणी खडसे यांना भाजपकडून उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत रोहिणी खडसे यांचा पराभव झाला. तसेच जमीन घोटाळ्या प्रकरणी खडसेंचे जावई अनेक वर्ष जेलमध्ये होते. या सर्व गोष्टींमुळे अस्वस्थ झालेले खडसेंनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. त्याआधी त्यांनी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी बीडमध्ये आयोजित कार्यक्रमात आपली मनातील धुसफूस उघडपणे स्पष्ट केली होती. यामुळे भाजपात एकच खळबळ उडाली होती. खडसेंच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशानंतर भाजप नेत्यांनी त्यांच्यावर टीका केली होती. मंत्री गिरीश महाजन यांनी त्यांच्यावर सडकून टीका केली होती. आता खडसे पुन्हा स्वगृही परतणार असल्याने आता गिरीश महाजन काय प्रतिक्रिया देतात? ते पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

**अनिलदादा यांच्या...**

काल बीडमध्ये आला. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी शरद पवार गटाचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या सोबत आलेल्या एका फोटो संदर्भात तात्काळ सोशल मिडियावर खुलासा केला. या खुलाशा नंतर ओबीसी समाजाकडून जगताप यांच्या भूमिकेचे जोरदार

मुंडे भगिनींच्या बाबतीत जरांगे पाटील यांची भूमिका

गेल्या काही दिवसात बीड जिल्हयामध्ये पंकजाताई मुंडे आणि प्रितमताई मुंडे यांच्या गाड्या अडवण्यात आल्या होत्या. मात्र हे आंदोलक जरांगे पाटील यांचे नाहीत असा खुलासा मुंडे भगिनींनी केला होता. हाच प्रश्न परवा जरांगे यांना विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले की, ज्यांनी आपल्या आरक्षणाला विरोध केला नाही त्यांना समाजाच्या पोरांनी अशा प्रकारे विरोध करु नये. केवळ बीड नाही तर राज्यात कुठेही ज्यांनी ज्यांनी विरोध केला त्यांनाच आपला विरोध असावा अशी स्पष्ट भूमिका जरांगे पाटील यांनी घेताली. गेल्या तीन चार महिन्यात मराठा आरक्षणाच्या विरोधात रस्त्यावर उतरुन जो संघर्ष झाला त्यामध्ये पंकजाताई मुंडे यांनी संयमाची भूमिका घेतली. दोन्ही समाजाच्या भावना एकमेकां विरुद आणखी प्रक्षोभक होवू नयेत चाची काळजी त्यांनी घेतली.स्वागत झाले. मात्र मराठा समाजाकडून टिकाही करण्यात आली. राजकिय भविष्याच्या दृष्टीने मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजात मतभेद असले तरी चालतील. परंतु मनभेद नसावेत याची काळजी घेण्याची आवश्यकता आहे. मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी लोकसभा निवडणूकीत तटस्थ भूमिका घेतली आहे. समाजाला तसेच समाजातील नेत्यांना सुध्दा जी भूमिका घ्यायची आहे ती घ्या असे स्पष्ट सांगितले आहे. त्यामुळे बीड जिल्हयातील मराठा समाजाचे नेते आता जातीवाद रोखण्यासाठी पुढे आले आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या समवेत आरक्षणाच्या लढचात पुढे असलेले अनिल दादा जगताप हे सध्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख या नात्याने पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी उभे आहेत. मुंडे यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे हे दोन दिवसापुर्वी नारायणगडावर आले होते. त्या ठिकाणी त्यांचा विश्वस्त मंडळा मार्फत सत्कार करण्यात आला. सत्काराच्या फोटोत अनिल दादा जगताप हे गडाचे विश्वस्त म्हणून उभे होते. परंतु त्याचा राजकिय अर्थ काढून अनिल दादांचा शरद पवार गटाच्या उमेदवाराला पाठींबा आहे अशा चर्चा सुरु झाल्या. त्यामुळे अनिल दादांनी तातडीने खुलासा करुन या फोटोचा राजकिय अर्थ काढू नये असे आवाहन केले. आपण पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत असेही त्यांनी सांगितले. जगताप यांच्या या भूमिकेमुळे मराठा ओबीसी असा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न जे लोक करत आहेत त्यांना चपराक बसली आहे.

**माझी निवडणुकीची**

यांच्या आमच्या युतीत राष्ट्रवादी पक्ष आलेला आहे...

माझी तयारी ही नेहमीसारखीच सुरू आहे. आमच्या युतीत राष्ट्रवादी पक्ष आलेला आहे. त्यांच्याबरोबर सुद्धा वेगवेगळ्या बैठकी आमच्या सुरू आहेत. त्यांचा जो पॅटर्न आहे आणि आम चा जो पॅटर्न आहे या दोन्हीमध्ये जे वेगळेपण आहे, त्याला कसं एकत्र ठेव्याचं याचा प्रयत्न मी नेहमी करत असते. मला वाटतं त्यांनी आणि मी अधिकची ताकद देऊन निवडून येऊ असे पंकजा मुंडे म्हणाल्या आहेत. उमेदवारीवर बोलतांना पंकजा मुंडे म्हणाल्या की, त्यांना तिकीट जाहीर झाले असेल, तर त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा आहे. म झी निवडणुकीची तयारी ही नुसती निवडणूक जाहीर झाल्यावर सुरु होत नाही, पाचही वर्ष चालू असते. ज्या पद्धतीचा संपर्क, ज्या पद्धतीचं काम, ज्या पद्धतीने समाजाच्या कामी येणार आहे. प्रीतम ताई सुद्धा फिरत होते .

**गुढीपाडवा,नववर्ष ...**

आयोजन असून या फेरीचा समारोप सहयोग नगर येथील सर्वेश्वर गणेश मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे होत आहे, या स्वागत फेरीत सर्वांनी सहभाग द्यावा असे आवाहन समस्त संयोजक धर्मप्रेमी नागरिकाच्या वतीने करण्यात येत आहे.

गुढीपाडव्याला प्रभू श्रीराम वनवासातून पुन्हा आयोध्देत परत आले, यांच्या स्वागतासाठी गुढी उभारून अयोध्या सजली होती, यावर्षी पाचशे वर्षाच्या संघर्षाच्या इतिहासानंतर परत अयोध्येत प्रभूषण जन्मभूमीत प्राणप्रतिष्ठा सोहळा थाटात संपन्न झाला आहे, त्यामुळे सर्वत्र उत्साह आणि आनंदी वातावरण झालेले आहेच या पार्श्वभूमीवर यावर्षी गुढीपाडव्याला विशेष महत्त्व आणि नववर्षाचे स्वागत मोठ्या उल्हासात साजरा करण्यासाठी प्रतिवर्षाप्रमाणे प्रभात समयी स्वागत फेरीचे आयोजन केले गेले आहे. यासाठी सर्व धर्मप्रेमी संघटना संस्था नागरिकांच्या एका बैठकीत नियोजन झालेले असून सर्वांनी नववर्षाच्या स्वागतासाठी एकत्र यावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# निवडणूक आणि प्रचार : राजकीय पक्षांनी घ्यावयाची खबरदारी

या देशातील प्रत्येक नागरिक हा भारतीय असून भारतीय म्हणून त्याला प्रत्येका निवडणुकीत उभे राहण्याचा अधिकार आहे. यासाठी वयाची २१ वर्ष पूर्ण होणे ही एक अट महत्त्वाची आहे. ज्याला निवडणुकीत उभे राहायचे आहे, असा व्यक्ती स्त्री-पुरुष कोणीही कुठल्यातरी राजकीय पक्षाचा सदस्य असायला हवा अथवा अपक्ष म्हणूनही निवडणूक लढवु शकतो.

जीवन जगत असताना ज्याप्रमाणे आपल्या आयुष्याला आपण काही नियम घालून दिलेले असतात. त्यामुळे आपले स्वतःचे आयुष्य हे सुखकर होत असते. त्याप्रमाणेच निवडणूक लढवितांनाही भारतीय निवडणूक आयोगाने काही बंधने नियम घालून दिलेले आहेत त्याचे पालन आपल्या वैयक्तिक आयुष्यात आणि निवडणूक लढवितांना दोन्ही वेळेस केल्यास फायदाच होतो . सध्या सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीचे वातावरण असल्याने राजकीय पक्षांनी घ्यावयाची काळजी हे महत्त्वाचे आहे. कारण, यावेळी ऐकणारा वर्ग /प्रेक्षक/ नागरिक हा मोठा असतो. त्यामुळे त्याचे पडसाद समाजात सकारात्मक तसेच नकारात्मक ही होऊ शकतात. म्हणून निवडणूक प्रचार प्रसाराच्या वेळेस राजकीय पक्ष आणि उमेदवारांनी विशेष काळजी घेणे अपेक्षित आहे. कारण, हेच निवडून आलेले लोकप्रतिनिधी भारतीय संसदेत बसून कायद्याचे राज्य चालवितात त्यावेळी त्यांना सर्वसमावेशक विचार करावा लागतो. तीच भावना त्यांनी निवडणुकीच्या काळात पक्षाचे ध्येय धोरणे मांडताना तसेच मतदारसंघातील मुद्दे मांडताना विचारपूर्वक ठेवावी.

निवडणुकीचा प्रचार प्रसार करताना जातीपाती वरून कुठलेही आक्षेपार्य भाषण देता येत नाही.



तसेच जातीचा उल्लेख करणे राजकीय पक्षांनी टाळायला हवे. कुठली एक जात श्रेष्ठ आणि कुठली एक जात निम्न असे न बोलता पक्षाचे ध्येय धोरणे अथवा भविष्यात जनतेला आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा बद्दल बोलणे जास्त सुसंगत असते.

ज्याप्रमाणे जातीपातीवर बोलणे टाळले पाहिजे त्याप्रमाणेच धर्म द्वेष न करता एखाद्या धर्माला विशेष महत्त्व न देता आपल्या संविधानामध्ये जो सर्वधर्म समभावाचा संदेश आहे तो जोपासणे आणि त्या परीने आपल्या राजकीय पक्षांचा अथवा उमेदवारांनी स्वतःचा प्रचार प्रसार करणे अपेक्षित आहे.भारतीय घटनेच्या उद्देशिकेत सामाजिक सलोखा पाळणे असे उल्लेखित असून सामाजिक सलोखा असल्यास समाजाची प्रगतीच होते अधोगती होत नाही याचे भान निवडणुकीच्या काळात राजकीय पक्षांनी ठेवल्यास निवडणूक चा हा काळ सर्वांसाठी सूसह्य आणि प्रबोधनाचा ठरेल.

निवडणुकीत उभे राहणारे उमेदवार हे प्रभावी व्यक्तिमत्व असतात. त्यामुळे त्यांचे असंख्य फॉलोवर्स अनुयायी असतात. जे त्यांच्या व्यक्तिमत्त्वामधून बऱ्याच गोष्टी शिकून स्वतःच्या आयुष्यात त्याप्रमाणे वागतात. निवडणुकीत उभे असणाऱ्या उमेदवाराने कायदा व सुव्यवस्था पालन करून त्याप्रमाणे प्रचार प्रसार केला तर आपसूकच त्यांचे फॉलोवर्स अनुयायी देखील त्याचप्रमाणे कायदा व सुव्यवस्था पालन करतील. त्यामुळे या निवडणुकीच्या धामधुमीच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे हे प्रत्येक उमेदवाराचे कर्तव्य आहे.

आताचा काळ हा सामाजिक माध्यमाचा काळ आहे. माध्यमांवर लाखो फॉलोवर्स असतात जे आपल्या नेत्याला उमेदवाराला फॉलो करतात या समाज माध्यमांवर एक संदेश खूप मोठी हानी करू शकतो त्याप्रमाणे प्रबोधनही करू शकतो. त्यामुळे सामाजिक माध्यमाचा वापर करताना तो काळजीपूर्वक विशेषतः निवडणुकीच्या काळात अधिक जागरूकपणे करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्याचे कुठलेही वाईट पडसाद उमटणार नाहीत.

निवडणुकीचा काळाचे वातावरण भारावलेले असते त्यामुळे शब्दच्छलाने शब्द भेद तयार होऊन एखादा वाद विकोपाला जाण्याचे नाकारता येत नाही अशावेळी कार्यकर्ता प्रवक्त्यांमध्ये स्पष्टता हवी. अंततः सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणूक ही कोणासाठी आहे निवडणुकीच्या मागचा उद्देश काय आहे मतदान कशासाठी करायला हवे मतदार कोण आहे कारण संपूर्ण निवडणूक ही भारताचे नागरिक म्हणजेच मतदार ज्यांचे वय १८ वर्षे पूर्ण झालेले आहेत असे नागरिक या सर्व प्रक्रियेचा महत्त्वाचा हिस्सा आहेत. त्यामुळे मतदान का करावे यासंदर्भात जागृतीची प्रयत्न राजकीय पक्षांकडून उमेदवारांकडून होणे गरजेचे आहे. मतदार जागृती उपक्रम अधिकाधिक केल्यास मतदानाचा टक्का वाढेल आणि एका चांगल्या लोकशाहीला ते पोषक असे ठरेल त्यामुळे या सर्व निवडणूक प्रक्रियेत राजकीय पक्षाची भूमिका ही महत्त्वाची असून मतदार जागृती त्यांच्यावतीने अधिकाधिक व्हावी असे अपेक्षित आहे.

**-अंजु कांबळे निमसरकर**
माहिती अधिकारी
जिल्हा माहिती कार्यालय बीड
९८९९११४१३०

# पोलीस असल्याचे सांगून ४ लाख ८५ हजाराचे दागिने लांबविले

## युसुफवडगाव पोलिसात दोघांवर गुन्हा

प्रतिनिधी । केज

**भोसा (ता. पंढरपूर) येथून परभणीकडे दुचाकीवरून निघालेल्या एकास पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोघांनी पोलीस असल्याचे ओळखपत्र दाखवून आचारसंहितेचे कारण पुढे करीत खिशातील पत्नीचे दागिने, हातातील अंगठ्या व ब्रासलेट काढून बॅगमध्ये ठेवण्यास लावून हात चलाखीने हे ४ लाख ८५ हजार रुपये किंमतीचे दागिने घेऊन पसार झाल्याची घटना केज - कळंब रस्त्यावर मांगवडगाव शिवारात घडली. याप्रकरणी युसुफवडगाव पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.**

धाराशिव जिल्ह्यातील कडकनाथवाडी (ता. वाशी) येथील नंदकुमार माणिकराव कुलकर्णी (वय ५२) हे सध्या परभणी शहरात रचना नगर भागात वास्तव्यास आहेत. ते साडूच्या मुलाच्या लग्नासाठी दुचाकीवरून तर त्यांची पत्नी बसने भोसा (ता. पंढरपूर) १ एप्रिल रोजी गेले होते. ३ एप्रिलचे लग्न आटपून ४ एप्रिलला सकाळी ५.४५ वाजता भोसा येथून नंदकुमार कुलकर्णी हे परभणीकडे निघाले होते. त्यांनी पत्नी बसने येणार असल्याने पत्नीचे चार तोळ्याचे सोन्याचे गंठण व अडीच तोळ्याचा सोन्याचा राणीहार घेऊन पॅन्टचे वॉच पॉकेटमध्ये ठेवला होता. सकाळी ९.३० वाजेच्या केज - कळंब रस्त्यावरील मांजरा नदीचा पूल ओलांडून मांगवडगाव शिवारात आनंद हॉटेलचे समोर पद्मावती मंगल कार्यालयाजवळ आले. त्यांच्या पाठीमागे कळंबकडून दुचाकीवर आलेल्या दोन लोकांनी हाताचा इशारा करुन दुचाकी थांबविण्यास सांगितली. त्या लोकांपैकी एकाचे अंगावर इटकरी रंगाची पॅन्ट व पांढरा हाफ शर्ट व दुसऱ्याच्या अंगावर क्रीम कलरची पॅन्ट व पांढरा हाफ शर्ट होते. अंगाने जाड व उंच ब रंगाने गोरे होते. त्यांचे वय अंदाजे ३५ ते ४० दरम्यान होते. त्यांनी पोलीस ड्रेसवरील ओळखपत्र दाखवून आचारसंहिता चालू असल्याने तुमची बॅग चेक करायची आहे, असे म्हणाल्याने त्यांनी बॅग दाखविली. त्यांच्या हातातील सोन्याच्या अंगठ्या पाहून आचारसंहिता चालु असल्याने सोने घालता येत नाही, ते काढुन बॅगमध्ये ठेवा असे म्हणाले. त्यांनी हातातील चार अंगठ्या व ब्रासलेट काढून बॅगमध्ये ठेवले. त्यानंतर त्यांनी खिसे चापचून वॉच पाकिटमधील पत्नीचे गंठन व राणीहार बॅगमध्ये ठेवण्यास सांगितल्याने तो काढुन बॅगमध्ये ठेवला. त्यानंतर त्यांनी हात चलाखीने हे ४ लाख ८५ हजार रुपये किंमतीचे दागिने घेऊन निघून गेले. त्यांनी बॅगमध्ये दागिने आहेत का ? याची खातरजमा केली. मात्र दागिने नसल्याने त्यांना फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर जवळच नदीवर चेक पोस्टवर असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना हा प्रकार सांगितला. त्यांनी युसुफवडगाव पोलिसात तक्रार देण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून अज्ञात दोघांविरुद्ध युसुफवडगाव पोलिसात कलम ४२०, १७०, ३४ नुसार गुन्हा दाखल झाला आहे.

# चिंच फोडुन बेरोजगारीवर मात

## लिंबागणेशमध्ये दुष्काळी परिस्थितीत महिलांच्या हाताला काम :- डॉ.गणेश ढवळे

प्रतिनिधी । बीड

यंदाचा कडक उन्हाळा त्यातच शेतीतील कामे उरकल्यामुळे मोलमजुरीच्या कामाची वानवा जाणवत असतानाच दुष्काळी परिस्थितीत लिंबागणेश परीसरात चिंच फोडण्याच्या कामामुळे अनेकांच्या हाताला काम मिळाले असुन या कामामुळे शेकडो कुटुंबियांचा रोजीरोटीचा प्रश्न काही अंशी मार्गी लागला असुन बेरोजगारी वर मात मिळविल्याचे दिसून येत आहे.लिंबागणेश येथे चिंचेचे स्थानिक व्यापारी असुन गुरूवारी बाजारदिवशी बाहेरूनही काही व्यापारी येऊन येथे व्यावसाय करतात.थेट झाडावरून चिंच आणुन ती



मजुरांकडून फोडुन घेऊन फोडलेली चिंच अहमदनगर, बार्शी, जामखेड येथील बाजारपेठेत पाठवण्यात येते.

१ किलो चिंच फोडण्यासाठी २० रूपये मिळतात.एका जणाला दिवसाकाठी १२ ते १५ किलो चिंच फोडुन होते.शिवाय घरातील अन्य व्यक्तीही मदत करतात. झाडांवर चढून बांबुने चिंचा झोडपून खाली पाडणे, पडलेल्या चिंचा वेचणे त्यावरील टरफल बाजूला करणे,चिंचा फोडुन गर व चिंचोके वेगळे करणे आदि कामे करावी लागतात.चिंचेपासुन साधारणतः ५५ टक्के गर,१४ टक्के चिंचा व ११ टक्के टरफल व शिरांचे उत्पादन मिळते.चिंचेचा हंगाम दरवर्षी फेब्रुवारी ते मे दरम्यान चालतो. या ४ महिन्यात ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते.दरवर्षी चिंचेचे झाड जुन -जुलै महिन्यात फुलोऱ्यात असताना त्याचा सौदा ओळखीच्या स्थानिक छोट्या व्यापा-यांशी करीत असतो.३ ते ५ हजार रुपये प्रति फुलोरा या दराने झाडांचा सौदा होतो.शेतकरी झाडे व्यापा-यांना विकतात.

ढगाळ वातावरण, भेसळयुक्त मालामुळे व्यापा-यांना आर्थिक फटका बसतो:- सतिश वायभट (चिंचेचे स्थानिक व्यापारी)

लिंबागणेश येथे गुरुवारी आठवडी बाजार दिवशी मोठ्या प्रमाणात चिंचेची आवक होते.५० क्विंटलच्या जवळपास खरेदी होते. माल पिवळसर पट्टीच्या दर्जाचा असेल तर ८ हजार पासुन १० हजार रुपयापर्यंत भाव मिळतो. चिंचोक्यांना २१०० प्रतिक्विंटल भाव आहे.मात्र काही ठीकाणी काळसर चिंच अथवा भेसळ याचबरोबर ढगाळ वातावरणामुळे चिंचेला आद्रतेमुळे पाणी सुटुन चिंच काळपट पडल्याने भाव कमी लागुन व्यापा-यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते.असे स्थानिक व्यापारी सतिश वायभट, चंद्रकांत आवसरे,शंकर पिंगळे यांनी सांगितले.

# महिलेस पळवून नेऊन अत्याचार

प्रतिनिधी । केज

**एका २९ वर्षीय महिलेचे राहत्या घरीहून पळवून नेऊन आरोपीने त्याच्या बीड येथील घरी अत्याचार केल्याची घटना घडली. तर आरोपीच्या आईने मुलासोबत शारीरिक संबंध ठेवण्यासाठी पीडित महिलेस मारहाण केली आहे. याप्रकरणी केज पोलिसात आरोपीसह त्याच्या आईविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.**

केज शहरातील एका २९ वर्षीय महिलेस २५ मार्च रोजी सकाळी ११ वाजता तिच्या राहत्या घरातून आरोपी सलमान शेरखान पठाण (रा. सुभाष रोड, चुना स्ट्रीट ता. जि. बीड) याने पळवून नेऊन त्याच्या घरी नेले. तिथे त्याच्या आईने मुलासोबत शारीरिक संबंध ठेव म्हणून काठीने व लाथाबुक्याने मारहाण केली. तर सलमान याने २५ मार्च ते १ एप्रिल दरम्यान या महिलेच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने शारीरिक संबंध ठेवून अत्याचार केला. अशी तक्रार पीडित महिलेने दिल्यावरून सलमान पठाण व त्याची हूर पठाण या दोघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे फौजदार प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाव्हळ
हे पत्र, मुद्रक, प्रकाशक व मालक विजयकुमार सुखदेव वाव्हळ यांनी सुयोग ऑफसेट प्रिंटर्स येथे छापुन निर्मिती प्रिंटस् कबाड गल्ली, जुन्या पोलीस स्टेशन समोर, बीड ४३११२२ येथुन प्रकाशित केले.
संपादक - विजयकुमार वाव्हळ Mo.9028429999 / 9657299999 :: कार्यकारी संपादक ::प्रथमेश विजयकुमार वाव्हळ Mo.9075409999
RNI.NO.MAHMAR/2015/64418 मुख्य कार्यालय :- प्रथमेश गॅस एजन्सी, पहिला मजला गेवराई - बीड रोड गेवराई ता.गेवराई जि. बीड - ४३११२७
संपर्क -Mo.9403825700/94058 17999 jaymahabharat2015@gmail.com * टीप : या अंकातील प्रसिध्द झालेल्या प्रत्येक बातमीशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# महाविकास आघाडीच्या घटक पक्षाची बैठक संपन्न

## उमेदवार बदलण्याची वेळ हाच भाजपाचा पराभव !- बजरंग सोनवणे

बीड /केज(दै. महाभारत)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पक्षाचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना उमेदवारी मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीतील घटक पक्षातील नेते व कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करण्यासाठी दि. ६ एप्रिल रोजी केज येथे मुक्ताई लॉन्स येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, काँग्रेस, शिवसेना आणि घटक पक्षातील नेत्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निरीक्षक जीवनराव गोरे माजी आमदार उषाताई दराडे, जिल्हाध्यक्ष आमदार संदीप भैया क्षिरसागर, माजी आमदार पृथ्वीराज साठे, भाई मोहन गुंड, राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेलच्याव प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, विधासभा प्रमुख सुरेश तात्या पाटील, शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष रत्नाकर आप्पा शिंदे, अमर देशमुख, अशोकरावजी वेडे, शंकरराव जाधव, देशमुख,, लांडगे, विष्णू घोलप, अजय बुरांडे, नितीन सोनवणे, बालासाहेब बोराडे, दत्तात्रय ठोंबरे, शिवाजी चौधरी, मुकुंद कणसे, कपिल मस्के, भाऊसाहेब गुंड, शेख शरीफ यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे यांनी कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन करताना म्हणाले की भाजपला हद्दपार करण्याची वेळ आलेली असून त्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करून बजरंग बप्पा सोनवणे यांना निवडून आणण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित नेते तथा कार्यकर्त्यांना केले . यावेळी बोलताना लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की, विरोधात असताना मी काय काम केले ? असा प्रश्न सत्ताधारी उपस्थित करीत आहेत; त्यांना मी सांगू इच्छितो कि जिल्हा परिषदे मार्फत जिल्हाभरात कामे केली अन आज याठिकाणी जमलेले कार्यकर्ते माझ्या केलेल्या कामाचीच पावती आहेत . दिल्ली ते गल्ली सरकार असताना जे विकास करू शकले नाहीत त्यांनी विकासाच्या वल्गना करणे हास्यास्पद आहे विद्यमान खासदार ना डावलून उमेदवार बदलण्याची वेळ आली हाच खरा भाजपचा पराभव आहे. जिल्ह्यात कोणताही उद्योगधंदा किंवा रोजगार निर्मितीचा प्रकल्प राबवला गेलेला नाही. हे भाजपाचे अपयश आहे. मी सामान्य कुटुंबातील असताना देखील साखर कारखाना चालवून त्याद्वारे तरुणांना हाताला काम देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मायबाप शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात योग्य भाव देत आहे. मी निवडून आल्यास निश्चितच जिल्ह्याच्या विकासासाठी नवनवीन प्रकल्प राबवून बेकारी कमी करण्याचा प्रयत्न करीन अशा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर हे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शिस्त आणि भूमिकेला महत्त्व असून भाजपची खोटे आश्वासने व फसव्या घोषणा याला मतदार किंमत देणार नाही. जरी भीतीने नेते पक्ष सोडून जात असले तरी सामान्य मतदार आमच्या सोबत असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माजी आमदार उषाताई यांनी त्यांचे मनोगत व्यक्त करताना आता विजयाची तुतारी फुंकण्याचे आवाहन केले. तर राष्ट्रवादी किसान सेलचा पूजा मोरे यांनी शेतात काबाडकष्ट करणाऱ्या सामान्यांचा कुटुंबातील मुलगा बजरंग सोनवणे यांना निवडून देण्याचे आवाहन केले.



---

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल कडून रमजान निम्मित

# बुखारी उर्दू शाळेत होतकरू विद्यार्थ्यांना ड्रेसचे वाटप

माजलगाव : अमर साळवे (दै. महाभारत)

सध्या रमजान महिना चालू आहे लवकरच मुस्लिम समाजात रमझान ईद मोठ्या उत्साहाने साजरी होत आहे,पवित्र रमझान च्या या पार्श्वभूमीवर रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल कडून बुखारी प्राथमिक व माध्यमिक उर्दू शाळेतील होतकरू ७५ विद्यार्थ्यांना रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ च्या गवर्नर रो.स्वाती हेरकल यांचे हस्ते नवीन ड्रेस चे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल चे अध्यक्ष इम्रान नाईक हे होते. यावेळी बोलताना रो.स्वाती हेरकल म्हणाल्या रोटरी क्लब हे अंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण आणि आरोग्य यावर काम करणारे खूप मोठे संगठन असून आज रमजानच्या पवित्र महिन्यात एका उर्दू शाळेत गरीब व




होतकरू विद्यार्थ्यांना ड्रेस चे वाटप करून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य निर्माण करता आले हे त्याहून मोठे पवित्र काम माजलगाव रोटरी सेंट्रल कडून झाले आहे रोटरी चा हा स्तुत्य असा उपक्रम आहे.

कार्यक्रमास रोटरी सचिव सुनील शिंदे डॉ.यशवंत राजेभोसले,डॉ.प्रियंका राजेभोसले,डॉ.सुनील गरड, पांडुरंग चांडक प्रा.नीलकंठ साबळे,अंकुश डाके सुदर्शन थावरे उमाकांत सोळंके नारायन गंडे इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख असद यांनी केले तर आभार प्रदर्शन रो.प्रभाकर शेटे यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख रिझवान शेख नाविद शेख हरून शेख बासेत सिद्दीकी मिनाज शेख रईस यांनी परिश्रम घेतले.

---

म. ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त

# भारतीय बौध्द महासभा व मुप्टा शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

शिरूर (दै. महाभारत)

तालुका शिरूर येथील भारतीय बौध्द महासभा व मुप्टा शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उदघाटन शिरूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा. शेख जमीर साहेब यांच्या हस्ते होणार आहे. तर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौध्द महासभा शिरूर तालुकाध्यक्ष आयु. बाळासाहेब बोराडे असणार आहेत. प्रमुख उपस्थिती मध्ये नगरसेवक श्री. वसंत काटे, प्राचार्य आप्पासाहेब येवले, जयदत्त क्षीरसागर साहेब यांचे स्वीय सहाय्यक प्रा. महारूद्र डोंगरे , मुप्टा शिक्षक संघटनेचे ज्युनियर विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत जावळे व जिल्हा सचिव प्रा नारायण घोलप आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरपंचायत चे बांधकाम सभापती अरुण भालेराव , नगरसेवक अमोल चव्हाण , नगरसेवक गणेश तळेकर, गटनेते गणेश भांडेकर, नगरसेवक अर्जुन दादा गाडेकर, सभापती अक्षय रणखांब, रिपब्लिकन पँथर राज्य सचिव युवराज सोनवणे, माजी नगरसेवक आनंद जावळे, सौ उषाताई सरवदे सभापती पंचायत समिती, प्राचार्य श्री आर बी जायभाये, प्राचार्य श्रीमती अस्मिता जावळे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर स्पर्धेसाठी इयत्ता आठवी ते बारावीचे विद्यार्थी पात्र असतील. या वक्तृत्व स्पर्धेचे विषय व नाव नोंदणी करण्यासाठी प्रा.डॉ.आत्माराम झिंजुर्डे, प्रा.नारायण तांबे , जयेंद्र निकम, प्रा. विनोद गलांडे , श्रीमती अनिता लाटे मॅडम यांच्याशी संपर्क साधावा.

सदर स्पर्धा दिनांक १० एप्रिल २०२४ बुधवार रोजी सकाळी ०९:०० वा टॅलेंट हब , पार्थ कॉम्प्लेक्स, शिरूर कासार येथे होणार आहे. या स्पर्धेचे बक्षीस प्रथम





२१०० रुपये रोख व सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय १५०० रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र तिसरे पारितोषिक १००० रुपये रोख, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र अशा स्वरूपाचे असणार आहे. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन मुप्टा शिक्षक संघटनेचे ज्युनियर विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत जावळे व जिल्हा सचिव प्रा नारायण घोलप, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब बोराडे, संयोजक रोहन जोगदंड ,प्रा.अमर खोले विशाल बलैया, आशिष भालेराव, विशाल सरवदे, प्रा. अक्षय साळवे, प्रा.राजकुमार केदार , अक्षय यादव , प्रा संदीप सटले,प्रा.संदिप आंधळे आदींनी केले आहे.

---

# बजरंग सोनवणे वडिलांच्या पुण्याईवर राजकारण करत नाहीत – जीवनराव गोरे

## बजरंग बप्पांचा विजय आजच निश्चित – बदामराव पंडित

गेवराई ।प्रतिनिधी

**बीड लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या विजयासाठी महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या पदाधिकाऱ्याची गेवराई येथे राष्ट्रवादी कार्यालयात पदाधिकाऱ्यांची व्यापक बैठक संपन्न झाली बजरंग सोनवणे हे शेतकरी पुत्र असून वाडवडिलांच्या पुण्याईवर त्यांनी कधीच राजकारण केले नाही असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे म्हणाले. बजरंग सोनवणे यांची उमेदवारी जाहीर होताच त्यांचा विजय निश्चित झाल्याचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले. तर मला मिळालेली उमेदवारी मॅनेज केलेली असल्याचा आरोप करणाऱ्या विरोधकांना सांगा, पैसे घेऊन विकणारी आवलाद मी नाही. पक्ष आणि जनतेशी एकनिष्ठ राहणारा मी कार्यकर्ता असल्याचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी ठणकावून सांगत विरोधकांचा समाचार घेतला.**

बीड लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार, शिवसेना उद्धव ठाकरे आणि काँग्रेस या पक्षाच्या महाविकास आघाडी कडून उमेदवारी जाहीर झालेले बजरंग सोनवणे यांच्या विजयाचा नियोजनासाठी गेवराई शहरातील नाईक नगर येथे असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात सर्व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक दिनांक ५ मार्च रोजी संपन्न झाली. या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार उषाताई दराडे, आमदार संदीप क्षीरसागर, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शेख महबूब, ज्येष्ठविधीज्ञ ॲड एम एस इदानी, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, युवानेते रोहित पंडित,






राष्ट्रवादी किसान सेल प्रदेशाध्यक्ष पूजा मोरे, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष अण्णासाहेब राठोड, अरुण इंगळे, मीनाक्षी देवकते आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जीवनराव गोरे म्हणाले की बीड जिल्हा हा स्वाभिमानी आणि क्रांतिकारी जिल्हा आहे. म्हणूनच शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांना महाविकास आघाडीने लोकसभेची उमेदवारी दिली आहे. भाजपाने शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस फोडून उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्यासह जनतेचा विश्वासघात केला आहे. देशात आणि राज्यात महागाई वाढली आहे. शेतीमालाला भाव नाही. तरुणांना रोजगार नाही,अशी भयानक स्थिती असताना देश हुकूमशाहीकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न सुरू आहे. बीड जिल्हा हा शरद पवार यांना मानणारा जिल्हा आहे या जिल्ह्याने पवार साहेबांच्या शब्दावर नेहमीच विश्वास ठेवलेला आहे. त्यामुळे जागरूक राहून सर्व कार्यकर्त्यांनी आणि मतदारांनी निवडणुकीला सामोरे जाताना बजरंग सोनवणे यांच्या विजयासाठी योग्य नियोजन करून कामाला लागावे असे आवाहन केले. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की बीड लोकसभा मतदारसंघातून बजरंग सोनवणे यांच्या उमेदवारीची मतदारसंघातले लोक वाट पाहत होते. त्यामुळे त्यांची उमेदवारी जाहीर होताच आजच त्यांचा विजय निश्चित झाला असल्याचे म्हटले.

बजरंग सोनवणे बोलताना म्हणाले की, पक्षनेता आणि जनतेची एकनिष्ठ राहणारा मी सामान्य कार्यकर्ता आहे. पैसे घेऊन मॅनेज होणारा आणि विकली जाणारी माझी अवलाद नाही. आजपर्यंत सामान्यांची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. त्यामुळेच जनता पाठीशी आहे. यावेळी बीड जिल्ह्यातून खासदार म्हणून येथील लोक मला आशीर्वाद देऊन दिल्लीला पाठवतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी अनेकांची समायोजित भाषणे झाली. या बैठकीला गेवराई विधानसभा मतदारसंघातील माजी सभापती पंढरीनाथ लगड, माजी सभापती तुकाराम हराळे, शामराव राठोड, अजय औटी, सरपंच मुकुंद बाबर, धर्मराज आहेर, बंडू पवार, कैलास शिंदे, शिवाजी चव्हाण, हरिभाऊ गलधर, पापा चव्हाण, काशिनाथ आडगळे, रोहिदास राठोड, तुषार पंडित, साहेबराव राठोड, संभाजी आहेर, कैलास राठोड, शेख फत्तेमामू, भाऊसाहेब शिंदे, अभिषेक शिंदे, राजू नाडे, प्रशांत मोरे, दत्ता राठोड, वैभव शिंगारे, विनायक चव्हाण, नितीन सोनवणे, शेख नवीद, शेख सोहेल, वनितताई चाळक, नवले ताई, वाघमारे ताई, सीताताई राठोड, आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकुंद बाबर यांनी केले.

---



माजलगाव : ( दै. महाभारत ) शहरातील फुले नगर भागातील बरकत नगर येथील आहाद हबीब सिद्दिकी यांनी वयाच्या ९ व्या वर्षी ठेवला पहिला रोजा आहाद व त्यांचे लहान बंधू मित्र परिवार मध्ये आनंदाचा वातावरण रात्री सहरीकरून रोजा इफ्तार करून व नमाज अदा करून अल्लाशी सर्वांसाठी प्रार्थना केली.

---

# भगवंताच्या छायेत सर्व सामावले आहे स्वामी अरुणनाथगिरिजी महाराज




खुलताबाद ।प्रतिनिधी

भगवंताच्या छायेत सर्व सामावले आहे. आपल्या वाणीतून अमृत आणि जिभेतून हरी बोल निघाले पाहिजे तरच परमार्थाची प्राप्ती होईल, नेम असावा तो नित्य असावा अर्थात नित्यनेम असावा फळप्राप्ती होते. असे स्वामी अरुणनाथगिरिजी महाराज वेरूळ येथील येथे सदुरू अक्काताई महाराजांच्या नाथ आश्रमाच्या वतीने आयोजित नवनाथ कथेत प्रवचन केले. आज कथेचा सहावा दिवस होता. यावेळी सदुरू अक्काताई महाराज,अन्नपूर्णा कैलास आश्रम मठाधीपती स्वामी अभयानंदगिरीजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. (गाथा नवनाथांची मालिकेतील कलाकारांची उपस्थिती.सोनी टिव्ही वरील गाथा नवनाथांची मालिकेतील प्रसिद्ध कलाकार मच्छिंद्रनाथांची भूमिका साकारणारे अभिनेते जयेश शेवलकर, जालिंदर नाथांची भूमिका साकारणारे अभिनेते वासुदेव मदने यांच्या सोबत सोनी टिव्ही मार्केटिंग ऑफिसर स्नेहल देशमुख , प्रोग्रामिंग ऑफिसर प्राची वळंजू आणि राज राजशेखर यांनीही नवनाथ कथेला आवर्जून उपस्थिती लावली.)

---



**चकलांबा ।शेख सलमान**

**(दै महाभारत)**

**गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे पवित्र रमजान महिना निमित्त मुस्लिम बांधवांना दि.६ एप्रिल शनिवार रोजी सकल मराठा समाजबांधवाकडुन यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम-हिंदू बांधवांनी उपस्थिती दर्शविली व इफ्तार पार्टीच्या माध्यमातून मुस्लिम-हिंदू एकतेचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमाला यावेळी मुस्लिम धर्मगुरु हजरत महेबूब मियां कादरी,शकील शेख,तय्यब पठाण, कृष्णा हिंगे ,कृष्णा शेळके, अशोक शेळके ,राजेंद्र शितोळे ,बाळासाहेब घाडगे ,अर्जुन पोपळघट, रवी शेळके,आदीसह हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# चांगले वाचन चांगल्या लेखनाकडे घेवुन जाते

## रोटरी क्लब आफ माजलगाव सिटी चा पंचेवीस शाळांना कपाट व ग्रंथ वितरणाचा लक्षवेधी उपक्रम....!!


माजलगाव : अमर साळवे
( दै. महाभारत )

शिक्षण व सर्वप्रकारच्या साक्षरतेसाठी जागतिक स्तरावर रोटरी काम करते. रोटरी क्लब आफ माजलगाव सिटी ची समाजाभिमुख कार्यप्रणाली अभिमानास्पद आहे . ग्रामिण भागात शिक्षण प्रणाली उन्नत करण्यासाठी प्रयत्न करत राहणे आपले कर्तव्य आहे. शाळांचे ग्रंथालय चांगले असावे. चांगले वाचन चांगल्या लेखनाकडे घेवुन जाते म्हणजेच सर्जनशीलता वाढते.

असे प्रतिपादन वाई येथील रोटरीच्या प्रांतपाल स्वाती हेरकळ यांनी पंचेवीस शाळांना स्टिल कपाट व ग्रंथ वितरण करताना माजलगाव येथे केले. अध्यक्ष स्थानी रो. अध्यक्ष राजेश देशपांडे तर सहायक प्रांतपाल गणेश वाघ , रोटरी क्लब सचिव डॉ. मधुकर घुबडे , रो. गोविंद बजाज , रो. अर्चना मोरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. मंगलनाथ कालनीत भव्य असा हा सोहळा संपन्न झाला. प्रतिमा पुजन व सरस्वती पूजनानंतर गोविंद बजाज यांनी प्रास्ताविक केले. गणेश वाघ यांनी स्वाती हेरकळ यांच्या जागतिक पातळीवरील कार्याचा गौरव करतच परिचय सभागृहात मांडला. कवी प्रभाकर साळेगावकर व सुरेखा गवळी यांचा रोटरीच्या वतीने पुरस्काराबद्दल सत्कार संपन्न झाला. आपल्या मार्गदर्शनात हेरकळ यांनी वाचन महत्व विषद करताना स्वतःच्या लहापणीच्या तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या ग्रंथप्रेमी आठवणी जागवल्या. अध्यक्षीय समारोप करताना देशपांडे म्हणाले रोटरी समुह एकदिलाने काम करतो म्हणुनच असे मोठे प्रोजेक्ट शक्य होतात.माजलगाव तालुक्यातील २५ शाळांच्या मुख्याध्यापक शिक्षक गणास कपाट व ग्रंथाचे वितरण रोटरीच्या स्वागत करुन संपन्न झाले.



शार्दुलेश्वर संस्थेचे सचिव रामकिशन सोळंके , डॉ.शंकर जूजगर ,रविंद्र कानडे , दामोदर संदीकर , श्रीकृष्ण शेजुळ ,राहुल लंगडे , गणेश गवारे , डॉ.स्वानंद कुलकर्णी, शशिकिरण गडम , शोभा वर्मा , लता जोशी ,प्रशांत पाटील , बालासाहेब देशपांडे, संदीप गुंडेवार, स्मिता लिंबगावकर , दिगंबर महाजन , डॉ. सुशिल लोढा , निरंजन वाघमारे , अंजली अकोलकर , आरेफ शेख , डॉ.रोहिणी थावरे , पंडितराव तिडके , विनायक रत्नपारखी , वर्षा भोसले , ऋतुजा थावरे , यांच्यासह शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. रो.सुरेखा गवळी व रो. वर्षा सोळंके यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचलन केले तर साळेगावकर यांनी आभार मानले.



गेवराई – कपिलधार येथे सा. प्रकाश आधार चे उपसंपादक शुभम घोडके यांच्या बहीणीच्या लग्न समारंभास उपस्थित राहून वधू-वरांना शुभेच्छा व आशीर्वाद दिले यावेळी उपस्थित सुनील पोपळे, केशवराव पंडित सर, अशोक गायकवाड, अशोक घाडगे, राजेंद्र साळुंके यांच्यासह अनेक मान्यवर मंडळी होते.

# अन मांडावरील खेळामुळे रात्री जागू लागल्या

ग्रामीण भागातील चित्र
कुडूत्री ( प्रतिनिधी)

मार्च, एप्रिल आणि मे महिन्याचे दिवस म्हणजे गावोगावी यात्रा, जत्रा व खेळ यांचे दिवस. सध्या जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात यात्रा, जत्रा व खेळ साजरे होत असल्याने आता त्यानिमित्त सायंकाळी मांड जागवण्यासाठी खेळे मंडळींकडून रात्रभर जागरण सुरू आहे.जिल्ह्यांतील सर्वच खेड्यांच्या यात्रा एकापाठोपाठ एक होत आहेत. यात्रेच्या पहिल्या दिवशी गावचा 'मांड' जागवण्याचा पारंपरिक रीतीरिवाज असल्याने आता मांड जागरण होत आहे. तर स्थानिक कलाकारांकडून मनोरंजन आणि करमणूक होणार आहे. काही गावातील मांडावरती स्त्रीप्रधान तमाशा करता येत नसल्याने पुरुषप्रधान तमाशाना काही गावात कार्यक्रमास आमंत्रित केले जाते.यात्रेच्या मुख्यदिवशी गावच्या पाटलांकडून देवाला



मानाचा नारळ ठेवल्यानंतर असा तमाशा करणाऱ्यांना परवानगी दिली जाते. एका दिवसाची करमणूक म्हणून व मांड जागवण्याचा रीतीरिवाज आहे.

# जनतेने दिलेल्या प्रेमातून उतराई होण्यासाठी मोफत कुटूंब कल्याण शस्त्रक्रिया– डॉ अशोक थोरात

## श्रेया हॉस्पिटलचा अभिनव उपक्रम

केज (दै. महाभारत)

जनतेने दिलेल्या आशिर्वाद व प्रेमातून कांही अंशी उतराई होण्यासाठी डॉ. अशोक थोरात व डॉ. प्रतिभा थोरात केज यांनी गुडी पाडव्याच्या शुभमुहूर्तापासून एक अभिनव उपक्रम हाती घेतला असून येत्या ९, एप्रिलपासून श्रेया हॉस्पिटल केज येथे मोफत कुंटूब कल्याण शस्त्रक्रिया करण्याचे ठरवले आहे.

स.न.१९९६ ते २०१७ तब्बल बावीस वर्ष श्रेया हॉस्पिटल च्या माध्यमातून केज परिसरातील रुग्णांची सेवा करत असताना जनतेने भरभरून प्रेम व आशिर्वाद दिलेले आहेत. जिल्हा शल्यचिकित्सक या पदावर पदस्थापना झाल्यामुळे श्रेया हॉस्पिटल च्या रुग्ण सेवेत खंड पडला होता. डॉ. तेजस जीवनराव थोरात रेडिऑलॉजी या विषयात व त्याची पत्नी डॉ. योगेश्वरी प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग या विषयात पदव्युत्तर प्रशिक्षण घेऊन श्रेया हॉस्पिटल केज येथे सेवा देणार आहेत. डॉ. तेजस यांनी डी. एम. आर. ई. पदवी प्राप्त केल्याने सोनोग्राफी चा तज्ञ म्हणून व डॉ. योगेश्वरी एम. एस. असून केज शहरात प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग या विषयातील एकमेव पदवीधारक म्हणून सेवा देणार आहेत. त्याच बरोबर सामान्य शस्त्रक्रिया, कॅन्सर शस्त्रक्रिया, मूत्ररोग शस्त्रक्रिया व मोतीबिंदु शस्त्रक्रिया ची सेवा सुरु करण्यात येणार आहेत. अनेक वर्षांच्या केज परिसरातील जनतेच्या भरभरून दिलेल्या प्रेमातून उतराई होण्यासाठी यापुढे कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया श्रेया हॉस्पिटल केज येथे मोफत करण्यात येणार आहेत. असे डॉ. अशोक थोरात यांनी कळवले आहे.



श्रेया हॉस्पिटल चा नव्याने शुभारंभ दि, ०९/०४/२०२४ रोजी स ११:३० वाजता करण्यात येणार आहे. या प्रसंगी आपण उपस्थित राहून डॉ तेजस व डॉ योगेश्वरी यांना केज तालुका व परिसरातील जनतेने आपले प्रेमरूपी आशिर्वाद द्यावेत अशी विनंती डॉ.थोरात, व डॉ. प्रतिभा थोरात यांनी केली आहे.

डॉ अशोक थोरात
डॉ प्रतिभा थोरात.

# आजेगाव येथे मुस्लिम बांधवासाठी इफ्तार पार्टी

## सौं.वैशालीताई वाघ आजेगांवकर याचा पुढाकार

सेनगाव (दै. महाभारत)

रमजान महिन्यांमध्ये अनेक ठिकाणी इफ्तार पार्टीचे आयोजन केले जाते.या पार्टी मधून सामाजिक सलोखा राखला जातो तालुक्यातील आजेगाव येथे पवित्र रमजान निमित्त मुस्लिम बांधवासाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. मुस्लिम समाजामध्ये रमजान हा महिना अत्यंत पवित्र मानला जातो व मुस्लिम बांधव रोजा(उपवास) हि करतात. मुस्लिम बांधवाचा सन्मान करण्यासाठी आजेगाव येथे सौं वैशालीताई वाघ यांच्या पुढाकारातून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पवित्र रमजान महिन्याच्या निमित्ताने दिनांक ६ एप्रिल रोजी मुस्लिम बांधवासाठी सौं वैशालीताई वाघ आजेगावकर यांच्या पुढाकारातून इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सौं वैशालीताई वाघ आजेगांवकर व सदरील इफ्तार पार्टी मध्ये मुस्लिम बांधवासह आजेगांव येथील सर्व समाजातील नागरिक उपस्थित होते




# परळी तालुक्यातील इंजेगावचा युवक सिंगापूर– इंडोनेशिया दरम्यान जहाजातून बेपत्ता !

## तीन दिवस उलटले :पालक चिंताग्रस्त: कंपनीकडून अधिक माहितीसाठी समाधानकारक प्रतिसाद नाही

परळी / विकास वाघमारे
(दै. महाभारत)

सध्या पुण्यात राहत असलेला मात्र मुळ परळी वैजनाथ तालुक्यातील इंजेगावचा प्रणव कराड नावाचा तरुण जहाजावरुन बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हा तरुण मर्चंट नेव्हीमध्ये एका कंपनीच्या जहाजावर काम करत होता. मात्र आता तो अचानक बेपत्ता झाल्याची माहिती प्रणवच्या कुटुंबियांना देण्यात आली आहे. या सगळ्या प्रकारामुळे प्रणवचे कुटुंबीय फार चितेत आहेत.तसेच या संदर्भात अधिक माहितीसाठी कंपनीकडून माहितीसाठी समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची खंत चिंताग्रस्त असलेल्या कराड कुटुंबियांनी व्यक्त केली आहे.



प्राप्त अधिक माहितीनुसार, विल्हेम्सन शिप मॅनेजमेंट प्रायवेट लिमिटेड या कंपनीत प्रणव काम करत होता. कंपनीच्या जहाजावर प्रणव डेट कॅडेट म्हणून काम करायचा. गेल्या तीन दिवसांपासून प्रणव बेपत्ता असल्याचं त्याच्या वडिलांनी सांगितलं आहे. मुंबईतल्या कंपनीने प्रणवचा शोध सुरू केला आहे. मात्र प्रणव बेपत्ता असल्याची माहिती दिल्यानंतर आतापर्यंत मुंबईतील कंपनीने कोणतीही समाधानकारक माहिती दिलेली नाही, असं त्याचे वडिल गोपाळ कराड यांनी सांगितले आहे. मुळ परळी तालुक्यातील इंजेगावचे कराड कुटुंब सध्या पुण्यातील वारजे परिसरात राहते. प्रणव कराड हा गेल्या सहा महिन्यांपासून मुंबईतील विल्हेलम्सन शिप मॅनेजमेंट इंडिया या कंपनीत नोकरीला आहे. याप्रकरणी गोपाळ कराड यांनी वारजे पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. २२ वर्षीय प्रणव शुक्रवारी रात्रीपासून बेपत्ता असल्याची माहिती त्याच्या कुटुंबीयांनी दिली आहे. जेव्हा तो बेपत्ता झाला तेव्हा तो सिंगापूर आणि इंडोनेशिया दरम्यान प्रवास करणाऱ्या टँकर जहाजावर तैनात होता. शुक्रवारी फोन करून कंपनीच्या अधिकाऱ्यांनी त्याच्या कुटुंबाला या घटनेची माहिती दिली. त्यानंतर कंपनीने मेल करुन प्रणवच्या घरच्यांना याबाबत कळवलं.

# आम्हीच बनवलेल्या रस्त्यांवरून येऊन आम्हाला शिव्या घालू नका – उदय सामंत

उरण (दै. महाभारत)

आम्हीच बनवलेल्या रस्त्यावरून येऊन आमच्यावरच टीका करू नका, असा टोला रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी शिवसेना 'उबाठा'चे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना नाव न घेता लगावला. महाविकास आघाडीने केवळ टीकेसाठी टीका करू नये, विकासावर बोलावे, असेही सामंत यांनी सुनावले. मावळ लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे तीन लाखांहून अधिक मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- आरपीआय- रासप मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी उरण विधानसभा मतदारसंघात जेएनपीटी वसाहतीतील बहुउद्देशीय सभागृहात महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित केली होती. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार रामशेठ ठाकूर, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, रिपब्लिकन पार्टी आठवले गटाचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, दिवंगत ज्येष्ठ नेते दि. बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील तसेच उरण तालुक्यातील महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.वेंगसरकर अकॅडमीच्या माध्यमातून खासदार श्रीरंग बारणे यांनी उत्तम क्रिकेटपटू घडवल्याचे सांगितले, पण स्वतः खासदार बारणे हे राजकारणातील उत्तम क्रिकेटपटू आहेत. गुगली बॉल वर सिक्सर मारणे त्यांना उत्तम जमते, अशी टिप्पणीही त्यांनी केली.रायगड जिल्ह्याचा पालकमंत्री असूनही मावळातील महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे नाव काय आहे, हे मला आठवत नाही, या शब्दांत सामंत यांनी प्रतिस्पर्धी उमेदवाराची खिल्ली उडवली.



## महायुतीकडून दि. बा. पाटील यांचा सन्मान

नवी मुंबई- पनवेल येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने घेतला व केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला. आता त्यावर केंद्र शासनाकडून कार्यवाही सुरू आहे. उद्धव ठाकरे यांना राजीनामा देण्याच्या दिवशी दि. बा. पाटील यांचे विमानतळाला देण्याची आठवण झाली होती, यातच सर्वकाही आले, असे सामंत म्हणाले.

## 'टीका करायचीच असेल तर पोहत या...'

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उरणमध्ये बोलताना महायुतीवर तोंडसुख घेतले होते. त्याला सामंत यांनी सडेतोड उत्तर दिले. चांगले झाले की फुकटचे श्रेय घ्यायची काही लोकांची प्रवृत्ती असते. निवडणुका आल्या की, त्यांना बाळासाहेब ठाकरे, दि. बा. पाटील यांची नावे आठवतात. निवडणूक गेल्या की त्यांचे 'फेसबुक लाईव्ह' सुरू होते. केंद्र व राज्य सरकारने उरण तालुक्यात मोठ्या प्रमाणात विकास कामे केली आहेत. केवळ भावनिक भाषणे देण्याऐवजी विरोधकांनी विकासावर बोलावे. उत्तम दर्जाचे रस्ते केल्यामुळे आता ५५ मिनिटांत उरणला येता येते. त्याच रस्त्यावरून यायचे आणि आमच्यावरच टीका करायची हे चालणार नाही. टीका करायचीच असेल तर तुम्ही बनवलेल्या रस्त्याने या, नाहीतर पाण्यातून पोहत या, अशी खरमरीत टीका सामंत यांनी केली.

## विकासाच्या मुद्द्यावर मागणार मते – बारणे

खासदार बारणे यांनी केंद्र शासनाच्या माध्यमातून उरण विधानसभा मतदारसंघात झालेल्या कामांची माहिती दिली. आठ पदरी रस्ता, पनवेल-उरण रेल्वे, देशातील सर्वात मोठे विमानतळ, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न, आदिवासी पाड्यांपर्यंत वीजपुरवठा, अटल समुद्र सेतू, मच्छीमारांच्या प्रश्नांचा पाठपुरावा, दत्तक ग्राम म्हणून उरणमधील बांधपाडा खोपटे गावाचा विकास केल्याचे बारणे यांनी सांगितले. केलेली विकास कामे व मतदारसंघातील संपर्क या जोरावर आपण विक्रमी मताधिक्याने विजयी होऊ, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## बारणे यांना 'रेकॉर्ड ब्रेक' मताधिक्य मिळेल

सामंत म्हणाले की, स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार निवडणुकीला उभे आहेत, असे समजून मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी काम करावे. मावळमधील सहाही आमदार महायुतीचे आहेत. त्यामुळे खासदार बारणे हे मोठ्या मताधिक्याने विजयी होणाऱ्या ४०० खासदारांपैकी एक असले पाहिजेत. महायुतीच्या नेत्यांप्रमाणेच कार्यकर्त्यांनीही एकजुटीने काम करून रेकॉर्ड ब्रेक मताधिक्य मिळवलेच पाहिजे.

## महायुतीमुळे उरणचा कायापालट – महेश बालदी

केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील महायुती सरकारने अनेक 'गेम चेंजर' प्रकल्प उरण तालुक्याला दिले असून त्यामुळे तालुक्याचा पूर्ण कायापालट झाला आहे, याकडे आमदार महेश बालदी यांनी लक्ष वेधले. उद्धव ठाकरे यांनी उरणमध्ये महाविकास आघाडीचा उमेदवार जाहीर केला. त्यावेळी त्यांनी २३ मिनिटांचे भाषण केले, मात्र त्यापैकी तीन मिनिटे देखील ते उरणविषयी बोलले नाहीत. मुख्यमंत्री असताना त्यांनी उरणसाठी काय केले, असा थेट सवाल बालदी यांनी केला. भावनिक भाषणांना मतदार भुलणार नाहीत, असेही त्यांनी ठाणकावून सांगितले.

# पंकजाताई मुंडेंनी वडवणी शहर पिंजून काढलं

## तुमचं प्रत्येक मत हे माझ्यासाठी वचन ; सर्व घटकांचा विकास हेच माझं ध्येय
## निवडणूक सोपी करण्याचं कोष्टी, बंजारा समाज बांधवांनी दिलं पंकजाताईना वचन

वडवणी (दै. महाभारत)

तुमचं प्रत्येक मत हे माझ्यासाठी वचन असणार आहे, समाजातील वंचित, पीडितांसह सर्व समाज घटकांचा विकास करणं हे ध्येय ठेवून मी काम करत आहे. लोकनेते मुंडे साहेब जिथपर्यंत पोचले होते, तिथपर्यंत जाण्याची संधी मला आपल्या आशीर्वादाने मिळणार आहे. या संधीचा उपयोग जिल्हयासाठीच होणार असल्याने मला आपले आशीर्वाद द्या असं आवाहन भाजपा राष्ट्रीय सचिव तथा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज इथे केलं.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने प्रचार दौरा करत असतांना पंकजाताई मुंडे यांनी आज वडवणी शहर पिंजून काढले. चौपदरा तांडा येथे बंजारा आणि चौंडेश्वरी मंगल कार्यालयात कोष्टी समाज बांधवांशी संवाद साधत त्यांनी शहरातील विविध समाज घटकातील नागरिकांच्या भेटी घेतल्या व संवाद साधला.

नागरिकांसमोर बोलताना पंकजाताई म्हणाल्या, आतापर्यंत मी लोकनेते मुंडे साहेब, खासदार डॉ.प्रितमताई, रजनीताई पाटील यांच्यासाठी मतं मागितली. आता पहिल्यांदाच स्वत:साठी मत मागायला आले आहे. इथं फक्त तेवढ्यासाठीच आले नाही तर तुमचं प्रत्येक मत हे माझेसाठी वचन असेल. सत्तेचा उपयोग मी जिल्हयाच्या विकासासाठीच केला. रेल्वे, राष्ट्रीय महामार्गा बरोबरच अगदी तांडयापर्यत रस्ता आणला. प्रत्येक गावात सभागृह, नळ योजना, २५१५ तून मुलभूत सोयी केल्या. विविध योजना राबवून सर्व सामान्य माणसाचे कष्ट कमी व्हावेत यासाठी प्रयत्न केला. ऊसतोड मजूरांना ऐतिहासिक ३४ टक्के दरवाढ केली. माझा विकास पोचला नाही असं एकही गाव नाही. त्यामुळे या निवडणूकीत मला आपले विजयरूपी आशीर्वाद द्या असं आवाहन पंकजाताईंनी यावेळी केले.



### गांव भाग काढला पिंजून

पंकजाताई मुंडे यांनी शहरातील सर्व समाज घटकातील नागरिकांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला. भावसार समाज महिला मंडळाच्या वतीने आयोजित श्री हिंगलाज माता प्रगटदिन उत्सवात त्यांनी सहभाग घेतला व महाआरती केली. यावेळी आमदार प्रकाशदादा सोळंके, माजी आमदार केशवराव आंधळे, रमेश आडसकर, राजाभाऊ मुंडे, भारत जगताप, बन्सीधर मुंडे, सुधीर ढोले, नवनाथ मेहत्रे, कचरू झाडे, गुरूप्रसाद गुरसाळी, अंकुश वारे आदी उपस्थित होते.

मुंडे साहेब जिथपर्यंत पोचले तिथपर्यंत जाण्याची संधी मला तुमच्या आशीर्वादाने मिळणार आहे. या संधीचा उपयोग जिल्हयाच्या विकासाला नक्कीच होईल असं पंकजाताई म्हणाल्या. निवडणूक अवघड आहे अशी चर्चा काही लोक करतात. खरचं आहे का निवडणूक अवघड? असा सवाल करताच उपस्थितांमधून अजिबात नाही असं उत्तर आलं. नागरिकांनी हात उंचावून 'ही निवडणूक अवघड नाही. तुम्हीच आम्हाला पाहिजेत. आम्ही सर्व मिळून ही निवडणूक सोपी करू असं अभिवचन त्यांना दिलं.



## पळसवाडी येथे १०८ कुंडीय शतचंडी व पर्जन्ययागाचे आयोजन

खुलताबाद (दै. महाभारत)

खुलताबाद: खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी गावात आज रोजी भूमि शुद्धि, कन्यापूजन, गोपुजन, अशा विविध पुजनांनी श्री श्री १००८ स्वामी गोविंद चैतन्य महाराज श्रद्धा आश्रम टुणकी यांच्या मार्गदर्शनाखाली आखतवाडा पळसवाडी परिसरात १०८ कुंडीय शतचंडी व पर्जन्ययागाचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले आहेत. दिनांक १८/०४/२०२४ रोजी यज्ञाला प्रारंभ होणार आहेत. विविध १६ राज्यातून संत महात्मा या यज्ञामध्ये संमलित होऊन प्रवचनातुन लाखो लोकांना मंत्रमुग्ध करणार आहे. सकाळी ७ वाजेपासून ते ११ वाजेपर्यंत ८०० यजमान यज्ञ पूजेसाठी सहभाग घेऊन या महायज्ञामध्ये होमवनाचा लाभ घेणार आहेत. अशाच प्रकारे दुपारी १ ते ४ वाजेदरम्यान ८०० यजमान या होमहवनाचा लाभ घेणार आहेत. याच पद्धतीने दुसऱ्या दिवशीही असाच विधी चालणार आहे. साधारण या महायज्ञासाठी तीन हजार ते साडेतीन हजार यजमान महापूजेचा लाभ घेणार आहेत.अन्नदान हे तीन दिवस रोज सकाळी ११ वाजेपासून ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत महाप्रसाद चालू असणार आहे.

या कार्यक्रमाच्या यज्ञासाठी दिले जाणारे दान व गोपूजन, गो ग्रास, ब्राह्मणासाठी सुवर्णदान, भूमीदान, गोदान, गोरगरिबांसाठी वस्त्रदान व तिन्ही दिवस अन्नदान चालणार आहे. असे आवर्जून श्री श्री १००८ गोविंद चैतन्य महाराज यांनी सांगितले आहे.

# चालकांचा ताबा सुटल्याने भीषण अपघात; सुदैवाने जीवित हानी टळली !

## काळ आला होता पण वेळ आली नव्हती.!

कंधार । धोंडीबा मुंडे (दै. महाभारत)

कंधार तालुक्यातील दिग्रस ( खुर्द ) गावाजवळील वळणदार रस्त्यांवर तुरीचा भुसा पशुखाद्य भरून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५० वरून आर.जे.११जी.बी २१५५ ट्रक जळकोट कडून नांदेड कडे जात असताना दिग्रस ( खुर्द ) गावाजवळ ट्रक चालकांचा वाहनावरील ताबा सुटून वळनदार रस्त्यांच्या कडेला धडकून भीषण अपघात झाला आहे.

यापुर्वीही याचं वळणावर दहा ते पंधरा वाहणाचे अपघात होऊन जीवंत व प्रचंड वित्त हानी झाली, असून सुद्धा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास जाग आली नाही,कधी येणार जाग ? सार्वजनिक बांधकाम विभाग अजून सतत दोन शतक अपघात होण्याची वाट बघतेय की काय असा प्रश्न जनतेला पडला आहे. येथील गावकऱ्यांना या राष्ट्रीय महामार्गावर चालतांना जीव धोक्यात घालून चालावे लागत आहे.



कोण कसा भरधाव वेगात येईल यांचा नेम नाही,कधी कोणाचा अपघात होईल याची खात्री नाही,या वेळीप्रसंगी संभाजीराव केंद्रे महाविद्यालयाचे प्राध्यापक कंधारकडे तर काही नांदेड कडे जाताना आमच्या डोळ्या देखत ट्रक धडकलीघटनास्थळी पोहचून तात्काळ विनाविलंब बचाव कार्याला सुरूवात केली. या गंभीर प्रसंगी यावेळी प्रा.डॉ तातेराव केंद्रे प्रा डॉ.नामदेव राठोड,उपप्राचार्य डॉ.व्यंकटराव पाटील,डॉ.मुंडकर संजय,प्रा डॉ बालाजी राठोड आदींसह गावकरी घटनास्थळी येऊन अपघातग्रस्त ट्रक चालक व त्यांच्या साथीदारांना दरवाजा तोडून पत्रा कापून बाहेर सुखरूप काढण्यात आले,यावेळी तात्काळ १०८ या दुरध्वनी क्रमांकावर फोन करून पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय कंधार येथे पाठविण्यात आले.

ट्रक चालक प्रकाश जाधव वय वर्षे ३७ क्लीनर बिरबर यादव वय वर्षे ४७ रा.धुम मध्यप्रदेश येथील असून,अक्षरशः गाडी पलटी झाली असताना दोघेही मध्ये अडकले होते.प्रचंड रकतस्राव होत होता.या गंभीर प्रसंगी रॉड पत्रा तोडून दोघांनाही सुखरूप बाहेर काढण्यात आले. यावेळी तात्काळ मदतकार्यासाठी सर्वांनी जमेल तसे काम करून दोघांनाही बाहेर काढल्याबदल संभाजीराव केंद्रे महाविद्यालयांचे प्राध्यापकांचे गावकऱ्यांनी कौतूक केले.

# मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने काम करावे

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

लातूर ।श्रीकांत चलवाड

**लातूर:लोकशाहीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अतिशय महत्व असून ही निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पडण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. यामध्ये मतदान केंद्रावर नियुक्त केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी यांची भूमिका महत्वाची असून सर्वांनी पारदर्शक, नि:पक्षपाती काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.**



**मतदान केंद्रावर नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण**
**भारत निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कामकाज करण्याचे निर्देश**

दयानंद सभागृह येथे आयोजित मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या लातूर शहर विधानसभा क्षेत्रातील अधिकारी, कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण कार्यक्रमात श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, लातूरच्या उपविभागीय अधिकारी तथा लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या सहायक निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, तहसीलदार सौदागर तांदळे, गट विकास अधिकारी तुकाराम भालके, नायब तहसीलदार पंकज मांदाडे, श्री. बरुरे, गणेश सरोदे यावेळी उपस्थित होते.निवडणूक प्रक्रियेत सहभागी होवून देशासाठी महत्वपूर्ण कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी आपल्याला मिळाली असून सर्वांनी अतिशय काळजीपूर्वक आणि सजग राहून ही जबाबदारी पार पाडावी. यामध्ये कोणत्याही प्रकारची चूक अथवा हयगय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. निवडणुकीत प्रत्येक बाबीसाठी भारत निवडणूक आयोगाने सुस्पष्ट सूचना निर्गमित केल्या असून आपल्या जबाबदारीशी संबंधित सूचनांचे अवलोकन आणि आकलन करून घेवून प्रत्येकाने काम करावे. एखादी बाब लक्षात न आल्यास संबंधित प्रशिक्षकांना विचारून त्याचे निराकरण करून घ्यावे. कोणत्याही परिस्थितीत मतदानादिवशी चूक होवू नये, कोणतीही नोंद राहून जावू नये, तसेच मतदान यंत्र जोडणी, मॉकपोलची प्रक्रिया सुरळीत पार पडावी, याची सर्वांनी काळजी घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या. मॉकपोल, अत्यावश्यक सेवेतील मतदारांचे मतदान, तसेच मतदान केंद्रावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी भरून द्यावयाचे विहित नमुन्यातील अहवाल अचूक राहतील याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.मतदान केंद्रावर नियुक्त कर्मचारी यांनी आपली जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडून मतदान प्रक्रियेत कोणताही अडथळा येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना उपविभागीय अधिकारी श्रीमती नऱ्हे-विरोळे यांनी दिल्या. तसेच अभिरूप मतदान केंद्र आणि पीपीटीद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. तसेच तहसीलदार सौदागर तांदळे, नायब तहसीलदार गणेश सरोदे, नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.याठिकाणी उभारण्यात आलेले प्रारूप मतदान केंद्र, मतदान केंद्रावर द्यावयाच्या सुविधा, मतदार जागृतीसाठी उभारण्यात आलेला सेल्फी पॉईंट आदी बाबींची जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी पाहणी केली.

# आमदार सोळंके यांचे स्वीय सहाय्यक महादु सोळंके यांना भररस्त्यावर मारहान

## माजलगांव शहरातील शांतता अन् सुव्यवस्था धोक्यात

माजलगांव : अमर साळवे ( दै. महाभारत )

माजलगाव मतदारसंघाचे आ. प्रकाश सोळंके यांचे स्वीय सहाय्यक महादेव सोळंके यांना भर रस्त्यावर मारहाण करण्यात आल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर वायरल झाला आहे. त्यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. मराठा आरक्षण जाळपोळ प्रकणातुन वाद झाला असल्याचे महादेव सोळंके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून समजले. सोळंके यांना मारहाण सुरू असताना मात्र शहरातील लोकांनी बघ्याची भूमिका घेतली असल्याचे चित्र या व्हिडीओ वरून दिसून येत आहे .



सोळंके यांचे स्वीय सहायकय महादु सोळंके यांना माजलगाव शहरातील मेन रस्त्यावरील

माजलगांव मतदारसंघाचे आ. प्रकाश रंगोली कॉर्नर / आण्णाभाऊ साठे चौकात बेदम मारहाण करत फरफटत नेल्याचा व्हिडीओ सोशल मिडीयावर वायरल झाला असून हा वाद मराठा आरक्षण संदर्भात आमदार सोळंके यांच्या बंगल्यावर झालेली जाळपोळ प्रकरणात नांव घेतल्या मुळे झाल्याचे महादेव सोळंके यांनी दिलेल्या फिर्यादीवरून निष्पन्न झाले आहे . झालेल्या या प्रकारामुळे शहरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महादेव सोळंके मारहान प्रकरणी दुसऱ्या दिवशी गुन्हा दाखल करण्यात आला असून अजयसिंह दिलिप राऊत, अभय राऊत सह इतर पाच जणांचा समावेश असल्याचे फिर्यादित म्हटले आहे. आरोपी विरूद्ध भादवी कलम ३२७ , १४३ , १४७, १४८, १४९, ३२३ , ५०४ , ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असुन पुढील तपास पोनी केतन राठोड करत आहेत.

सदरील घटणेचा निषेध व्यक्त करत महादेव सोळंके यांच्यावर अचानक झालेला हल्ला हा मराठा आंदोलनातील जाळपोळी प्रकरणातील आरोपी अजय राऊत यांच्या कडून झालेला असुन त्याची अद्याप पूर्णतः जमानत झालेली नाही याची दखल तातडीने पोलिस प्रशासन घेईल.

– आ. प्रकाश सोळंके

महादेव सोळंके मारहान प्रकरणी आरोपी विरोधात गुन्हा दाखल झाला असुन संबधीत आरोपींना लवकरच ताब्यात घेतले जाईल

पोनी . केतन राठोड –



**गेवराई – पं.स.सदस्य तथा जय भवानी न्युज पेपर एजन्सीचे मालक परमेश्वर खरात यांच्या माऊली कृपा निवास या नुतन वास्तुच्या वास्तुशांती प्रसंगी ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर, गोरक्षनाथ संस्थानचे महंत ह.भ.प.दत्ता महाराज गिरी यांनी सदिच्छा भेट देवून आशीर्वाद दिले यावेळी परमेश्वर खरात, राधाताई परमेश्वर खरात, मुख्याध्यापक भक्तराज पौळ, पत्रकार विनोद पौळ यांच्या सह आदि उपस्थित होते.**

# कानडीबदन ग्रामस्थांनी घेतली तुतारीला मतदान करण्याची शपथ

## केज तालुक्यात बजरंग सोनवणे यांचा झंझावती दौरा

**बीड /केज/नंदकुमार मोरे (दै. महाभारत)**

**राष्ट्रवादी काँग्रेस आणि महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केज तालुक्यातील अनेक गावांना जात गाठीभेटी घेऊन गावकऱ्यांशी संवाद साधला यादरम्यान ठिकठिकाणी महिला भगिनींनी त्यांचे औक्षण केले तर कानडीबदन ग्रामस्थांनी तुतारीलाच मतदान करण्याची शपथ घेत सोनवणे यांना आपला पाठिंबा उघडपणे व्यक्त केला आहे शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांनी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आपल्या गाठीभेटीचा कार्यक्रम आता झपाट्याने वाढवत एकाच दिवसात अनेक गावांना गाठीभेटी द्वारे आपली भूमिका विषद करण्यावर भर दिला आहे याच क्रमात त्यांनी आज दिपेवडगाव, पळसखेडा, कानडी बदन, कौडगाव, बनसारोळा, इस्थळ, सौंदना, नायगाव, धनेगाव, धनेगाव कॅम्प येथे भेट देऊन गावकऱ्यांशी संवाद साधला.यावेळी त्यांच्या सोबत माजी पंचायत समिती सदस्य बंडू चौधरी, भुसारी आप्पा, डॉ उत्तम खोडसे हे होते.**

या प्रसंगी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन केले. बजरंग सोनवणे यांचे गावागावात मोठ्या प्रमाणात ढोलताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले अनेकठिकाणी सुवासिनींनी त्यांचे औक्षण केले. या प्रसंगी दीपेवडगावचे सरपंच दिपक गुळभिले, सुग्रीव गुळभिले, गोविंद चव्हाण, बापूराव गुळभिले, सर्जेराव तपसे, तसेच पळसखेडा येथे गावचे सरपंच वसंत चव्हाण, यशवंत चव्हाण, श्रीमंत चव्हाण, गोविंद चव्हाण, युवराज चव्हाण, कृष्णा धन्वे, श्रीहरी चव्हाण, महेश गायकवाड, प्रकाश चव्हाण, कैलास चव्हाण, रंगनाथ गायकवाड आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

कौडगाव आणि कानडीबदन येथे भेट दिली. सरपंच दिगंबर पांचाळ, उपसरपंच राजाभाऊ जगदाळे, माजी सरपंच उद्धव बप्पा दळवे, आण्णा साखरे, लक्ष्मण साखरे, सुधाकर दळवे, योगीराज साखरे, सौ. ज्योती साखरे,



आणि महिला व पुरुष यांची हजेरी होती. तसेच कौडगावचे सरपंच नारायण महाकुंडे, उपसरपंच बळीराम चाटे, शरद बापू पवार, रंजीत पवार, माजी सरपंच रामचंद्र पवार, रवी चाटे, प्रशांत पवार, सर्जेराव पवार, ग्रामपंचायत सदस्य पवार यांची उपस्थिती होती

तर बनसारोळा, इस्थळ गावाला आज भेट दिली.या भेटीमध्ये गावातील नागरीकांशी आपुलकीने संवाद साधला. यावेळी रुपेश बोरगावकर, सुधीर रानमारे, अरुण राऊत यांच्यासह माजी सभापती युवराज दादा गोरे, सरपंच जयचंद धायगुडे, कृष्णा गोरमाळे, बबन रोकडे, विठ्ठल कावळे, अनिकेत गोरे, दिलीप गोरे, बाळासाहेब धायगुडे, तसेच इस्थळ गावामध्ये रमेश आ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.धनेगाव येथेही प्रचंड उत्साहात स्वागत करण्यात आले यावेळी माजी सरपंच सुहास गुजर, उपसरपंच किशोर सोनवणे, यांची व प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती तर नायगाव येथे सरपंच विवेक खोडसे, चेअरमन रामकीसन खोडसे,लक्ष्मण खोडसे, सर्जेराव खोडसे, शशिकांत खोडसे, राहुल खोडसे, डॉ. उत्तम खोडसे, आदींची उपस्थिती होती

### गावकऱ्यांनी घेतली तुतारीला मतदान करण्याची शपथ

देवा शपथ खरं बोलेन खोटे बोलणार नाही अशी शपथ न्यायालयात घेतली जाते मात्र लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळी सुरू झालेली असताना केज तालुक्यातील एका गावात गावकऱ्यांनी चक्क तुतारीला मतदान करण्याची शपथ घेतली आहे. गावकऱ्यांनी एकत्र येऊन आपल्या आई-वडिलांना साक्ष ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाला आणि त्यांचे बीड लोकसभेचे उमेदवार यांना मतदान करण्याची शपथ घेतली आहे. या वेळी गावकऱ्यांनी घेतलेली शपथ अशी आहे की, आम्ही इमानदारीने अशी शपथ घेतो की, येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीत शरदचंद्रजी पवार यांच्या तुतारी या चिन्हा समोरील बटन दाबून आई-वडिलांच्या इमानदारीने त्यांना मतदान करू. नंतर निवडून आल्यास त्यांच्या हाताला धरून काम करून घेऊ. अशी निष्ठापूर्वक शपथ घेतल्याने केज तालुक्यातील कानडीबदन हे गाव चर्चेत आले आहे.



# डॅशिंग स.पो.नि.शहाजी शेळके यांचा ठाणे पोलीस आयुक्तांनी केला गौरव...!

अमित जाधव ।प्रतिनिधी

ठाणे पोलीस आयुक्तायाच्या वतीने उत्कृष्ट तपासासाठी दिला जाणारा २०२४ मधील उत्कृष्ट तपास प्रमाणपत्र मुंब्रा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके यांना मिळाल्याने मुंब्रा ,दिवा शहरवासीय व मित्र मंडळी तेच परिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.ठाणे हद्दीतील दिवा शहर म्हातार्डी गाव, येथे सन २०२१ मध्ये घरामध्ये खेळायला आलेल्या चार वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर कुणीही नसल्याचा फायदा घेत लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीस अटक करून मुंब्रा पोलिस स्टेशन अंतर्गत सहायक पोलीस निरीक्षक शहाजी शेळके यांनी उत्कृष्टरित्या तपास करत आरोपीस गुन्हा २४/२०२१ पोक्सो व अट्रासिटी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. शेवट पर्यंत न्यायालयात भक्कमपणे पुरावे सादर केले अखेर आरोपीस ठाणे जिल्हा सत्र न्यायालयाने द्रव्यदडासह २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावत पीडित मुलीच्या कुटुंबीयांना न्याय दिला.

गुन्ह्याचा तपास दोषसिद्धी बाबत ठाणे पोलीस आयुक्त श्री.अशितोष डुंबरे यांच्या हस्ते दिनांक ६ एप्रिल २०२४ रोजी सहायक पोलिस निरीक्षक शहाजी शेळके यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले

# पाणीटंचाईत टॅकर खेपात अनिमित्ता खपवून घेणार नाही -आ. लक्ष्मण पवार

## पाणीटंचाईत टॅकर खेपात गुत्तेदाराकडुन अनिमित्ता आसल्याच्या ग्रामस्थांकडून आ.पवारकडे तक्रारी

गेवराई: दुष्काळी परिस्थितीची दाहाकता लक्षात घेऊन आपण जानेवारी,फेब्रुवारीपासून मतदारसंघातील पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयात बैठका घेऊन गेवराई मतदारसंघातील पाणीटंचाईचा आढावा घेऊन आज पर्यंत ६० पाणी टँकरच्या प्रस्तावाला मंजुरी मिळावी म्हणून मी स्वतःहा जातीने पाठपुरावा करून टँकर सुरु करुन घेतले आहेत पण शासनाने लोकसंख्येनुसार ठरवून दिलेल्या टँकर खेपा थेट गावात मिळत नाहीत म्हणून नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आसल्याच्या तक्रारी ग्रामस्थ करत आहेत तरी टँकर सुरु असलेल्य गावच्या तलाठी,मंडळाधिकारी,ग्रामसेवक यांनी याबाबतीत गाभिर्याने काम करुन प्रत्येक गावात पाणी टँकर आले आहे किवा नाही यांची दखल घेतली पाहिजे तसेच टँकर गुत्तेदारांने सुध्दा व प्रशासनाने लोकसंख्येनुसार ठरवून देण्यात आलेल्या खेपात अनियमित्ता खपवून घेणार नाही असा इशारा आ.लक्ष्मण पवार यांनी प्रशासन व गुत्तेदारास दिला आहे

.मराठवाड्यातील नागरिक भयानक दुष्काळी परिस्थितीचा सामना करत तर दुष्काळी परिस्थितीत गेवराई मतदारसंघात पाणीटंचाई निर्माण झाली आहे दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता गेवराई मतदार संघाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी बीड जिल्हाधिकारी कार्यालय तहसील कार्यालय गेवराई या ठिकाणी पाणीटंचाईचा आढावा घेऊन गेवराई मतदारसंघात टंचाईग्रस्त गावांना पाणी टँकरचे प्रस्ताव तहसील कार्यालयामार्फत बीड जिल्हाधिकारी कार्यालया पाठवण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आले आहेत

त्या सर्व प्रस्तावाला उपविभागीय अधिकारी मॅडम कविता जाधव यांनी मंजुरी देऊन पाणी टँकर सुरू करण्याचे आदेश दिलेले आहे पण संबंधित टँकर गुत्तेदाराच्या मार्फत जो पाणीपुरवठा केला जातो त्यामध्ये प्रशासनाने लोकसंख्येनुसार ठरवून दिलेल्या खेपात अनियमित होत असल्याच्या अनेक तक्रारी आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या संपर्क कार्यालयात येत आहे तरी पाणीटंचाईचं गांभीरे लक्षात घेता संबंधित गुत्तेदाराला आमदार लक्ष्मण आण्णा पवार व जिल्हाधिकारी यांनी कडक सूचना देणे आवश्यक आहे

# आज शिरूर कासार येथील श्री कालिका देवी चा उत्सव

आज पासून नवे गहू खाण्यास प्रारभ

शिरूर कासार व पंचक्रोशीतील सर्वांचे आराध्य दैवत व कासार समाजाची कुलस्वामिनी श्री कालिका देवीचा फाल्गुन अमावस्या असल्याने याच अमावस्याला नव्याची अमावस्या असे संबोधले जाते आणि याच उत्सवानंतर आजपासून नवीन गहू खाण्यास प्रारंभ देखील करण्यात येतो या अगोदर या गव्हाला येथील ग्रामस्थ हात देखील लावीत नाहीत तर येथील गिरणे वाले हे गहू दळून देखील देत नाहीत असा हा पूर्वीपासून आलेला रितीरिवाज आहे आजही या कुलाचाराचे सर्वत्र पालन केले जात आहे आज सोमवार दिनांक आठ फेब्रुवारी रोजी फाल्गुन अमोशा म्हणजेच नव्याची अमोशा म्हणून येथील श्री कालिका देवीचा उत्सव मोठ्या आनंदात व भक्ती भावाच्या वातावरणात साजरा केला जातो या दिवशी मंदिरातून श्री कालिका देवीची मूर्ती भव्य पालखीमध्ये सवाद्य मिरवणूक काढून येथील श्री कालिका देवीच्या डोहावर आणली जाते तिथे आल्यानंतर गंगाजल आणि म्हणजेच शनीच्या राक्षस भुवन वरून अनवाणी पायाने गंगाजल आणून श्री कालिका देवीस महा अभिषेक केला



जातो यावेळी कावडीने आणलेल्या गंगाजलाने देवीच्या मूर्तीस महाविषेक घातला जातो वेद ब्राह्मणांच्या मंत्रघोषांमध्ये देवीची पूजा आरच्या करून महाआरती घेण्यात येते याप्रसंगी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित असतो याप्रसंगी दिवसभर समाज बांधव आपापली प्रतिष्ठान बंद ठेवून देवीची आराधना करीत असतात पुन्हा हा पालखी सोहळा मंदिरात नेहून सिंहास नास्थ केला जातो या ठिकाणी पुन्हा महाआरती होऊन नवीन गव्हाचा आणलेला नैवेद्य देवीला दाखवून त्यानंतर घरोघरी सुवासनी जेवू घातल्यानंतर सर्वांनी उपवास सोडला जातो या उत्सवालाच नव्याची अमावश्या असे संबोधले जाते या दिवशी दिवसभर आबाला वृद्ध अनवाणी पायाने राहत असतात व रात्री सर्वांनी नवीन गव्हाचं सेवन केल्यानंतर उपवास सोडून यानंतरच सर्वांना नवीन गहू खाण्याचा अधिकार प्राप्त होतो याप्रसंगी येथील सिद्धेश्वर संस्थानाचे मठाधिपती ह भ प स्वामी विवेकानंद शास्त्री महाराज हा सोहळा आपल्या डोळ्यामध्ये साठवण्यासाठी या ठिकाणी उपस्थित असतात हा सर्व सोहळा श्री कालिका देवी संस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा नगरपंचायत चे प्रथम नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर उपाध्यक्ष गोविंद पाटील सचिव बापूराव गाडेकर व त्यांचे सर्व सहकारी विश्वस्थ यांच्या नेतृत्वाखाली पार पडतो




# आ. लक्ष्मण पवार यांच्या उपस्थितीत भाजपा स्थापणादिना निमित्त विविध कार्यक्रम संपन्न

गेवराई: भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने महाराष्ट्रातील आमदार ,खासदार, सुपरवारियर्स, शक्ती केंद्रप्रमुख, बुथप्रमुख,याना भारतीय जनतापक्ष स्थापनादिना निमित्त विविध कार्यक्रम दिलेले आहेत

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे यांच्या आदेशानुसार गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आ.लक्ष्मन पवार यांनी दि.४ एप्रिल रोजी गेवराई मतदारसंघातील बुथप्रमुख,शक्तीकेंद्र प्रमुख, सुपरवारियर्स यांची बैठक घेऊन गेवराई मतदारसंघातील पक्षाने दिलेले सर्व कार्यक्रम बुथवर यशस्वी करा अशा सुचना देण्यात आली होती तर आ.लक्ष्मण पवार सुध्दा बुथ क्र.१३०,१३१, वर सुपरवारियर्स म्हणून पक्षाने नियुक्ती केलेली आहे त्याअनुषंगानेच भारतीय जनतापक्ष स्थापनादिनी सुपरवारियर्स म्हणून असलेल्या बुथवर त्यानी कार्यक्रम घेऊन मतदारसंघातील सर्व बुथवर कार्यक्रम यशस्वी करावे अशा सुचना करण्यात आली आहे यावेळी अनिल पौळ,शाम कुंड, राजाभाऊ राक्षसभुवनकर, दादासाहेब गिरी, इश्वर पवार, रमेश शेडगे,लक्ष्मण चव्हाण,बाळासाहेब गायकवाड, कैलास पवार, आदी उपस्थित होते



# सिद्दीका सलीम पठाण हीचा आयुष्यातील पहिला रोजा

चकलांबा ।प्रतिनिधी

सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना सुरू असून जिकडे-तिकडे आनंदाचे व भक्तीभावाचे वातावरण दिसून येत आहे. या महिन्यात सर्व मुस्लिम बांधवांना रोजे ठेवणे फर्ज (अनिवार्य) आहे. महिनाभर त्यामुळे सर्व मुस्लिम महिला पुरुष व युवक युवती इतकेच नव्हे तर लहान मुले-मुली सुद्धा स्वेच्छेने रोजे ठेवून, नमाज व कुरआन पठण करून अल्लाहची (ईश्वराची) इबादत (उपासना) करतात. यामध्ये चिमुकले सुध्दा मागे नसतात. त्यांच्यातही रोजे ठेवण्याची व अल्लाहची इबादत करण्याची चढाओढ असते. या पवित्र महिन्यात लहान मुले-मुलीही रोजा ठेवून अल्लाहकडे दुआ (प्रार्थना) करतात. रविवार दिनांक ०७ एप्रिल २०२४ रोजी महाराष्ट्र न्युज १० संपादक सलीम पठाण यांची मुलगी सिद्दीका वय वर्षे ५ या चिमुकलीने पवित्र रमजान महिन्यात आपल्या जीवनाचा पहिला रोजा पुर्ण केला.

दिवसभर रोजा ठेवल्यानंतर या पहिल्या रोजा प्रित्यर्थ तीचा पुष्पहार घालून सूर्यस्तानंतर तीची रोजा खुलाई (इफ्तार) करण्यात आला आहे. (म्हणजे उपवास सोडण्यात आला.) दिवसभर रोजा ठेवून व नमाज पठण करून दुआ केली. त्यामुळे त्यांच्या परिवारात उत्साहाचे वातावरण असून सिद्दीकाचे सर्वत्र कौतूक होत आहे.



माजलगांव : ( दै. महाभारत ) माजलगाव वकील संघाचे निवडणुकीत ऍड.श्री भानुदासरावजी डक यांची अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन आणि शुभेच्छा देताना लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना सचिव सुरेश लगड आणि लिगल प्रमुख अशोक पाटील .